DAILY THANEVAIBHAV RNI REGD NO. 27878/ 75, POSTAL NO. THC/186/2018-2021

कल्याण-डोंबिवली, नवी मुंबई, मीरा-भाईंदर, अंबरनाथ-बदलापूर, भिवंडी, उल्हासनगर, मुरबाड, शहापूर.

www.thanevaibhav.in

# ठाणेवैभव

देवा श्री गणेशा

श्री गणेश चतुर्थी

ठाणे जिल्ह्याचे सर्वाधिक खपाचे परिपूर्ण दैनिक | इष्ट ते छापणार | संस्थापक : नरेन्द्र बल्लाळ

भारतीय सौर दिनांक भाद्रपद १९ शके १९४४ | वर्ष ४७ | अंक १७ | शुक्रवार १० सप्टेंबर २०२१ | पाने ८ | रु. ४

संपादक : मिलिन्द बल्लाळ






# अखेर दिव्याचे डम्पिंग भांडर्लीला हलवणार

**ठाणे:** डायघर आणि तळोजा येथील डम्पिंगच्या जागेचा प्रयोग फसल्यानंतर आता भांडर्ली येथील चार हेक्टर जागा भाडेतत्वावर घेण्यात येणार आहे. तसा ठराव बुधवारी झालेल्या ठाणे महापालिकेच्या महासभेत मंजूर करण्यात आला असून दिवेकरांची यमयातनांतून सुटका होणार आहे.

ठाण्यात कचऱ्यावरून अनेकवेळा आंदोलने करण्यात आली आहेत. दिवेकरांच्या याबाबतच्या संतप्त भावना आहेत. कचऱ्यावर प्रक्रिया करण्यासाठी गेल्या काही वर्षात अनेक प्रयोग करण्यात आले आहेत. मात्र हे सर्वच प्रयत्न अपयशी ठरल्याने ठाणे शहरात अजूनही कचऱ्याच्या प्रश्न अनुत्तरितच आहे. 1995 -96 साली 300 मॅट्रिक टन कचऱ्यावर प्रक्रिया करण्यासाठी कोपरी येथे प्रकल्प उभारण्यात आला होता. 29 वर्षाच्या करारावर हा प्रकल्प ठाणे महापालिकेला एका कंपनीला चालवण्यासाठी दिला होता. दोन वर्ष हा प्रकल्प सुरळीत चालल्यानंतर कोपरी गावातील नागरिकांनी या प्रकल्पाला आरोग्याचा मुद्दा उपस्थित करून विरोध केला. त्यामुळे ठाणे महापालिकेला हा प्रकल्प बंद करावा लागला. त्यानंतर पालिकेने आपला मोर्चा डायघरकडे वळवला. 19 हेक्टर शासनाच्या जमिनीवर 500 मॅट्रिक टन कचऱ्यावर निर्मिती करण्याचा प्रकल्प महापालिकेने हाती घेतला. या प्रकल्पाला मंजुरी मिळेपर्यंत बराच कालावधी लागला. मात्र एवढे करूनही डायघरमधील नागरिकांनी देखील या प्रकल्पाला विरोध केला.

एमएमआरडीएच्या वतीने तळोजा येथे सामायिक भराव भूमी प्रकल्प राबवण्याचा निर्णय घेण्यात आला. या ठिकाणी एमएमआरडीए क्षेत्रातील महापालिका कचरा आणून टाकणार होत्या. मात्र यामध्येही पालिकेला यश आले नाही. डायघर आणि तळोजा येथील प्रकल्प बारगळल्यानंतर मुंब्रा शीळ येथे कचऱ्यावर प्रक्रिया करण्यासाठी जागा निश्चित करण्यात आल्याची घोषणा पालिका प्रशासनाच्या वतीने करण्यात आली. 100 टन कचऱ्यावर निर्मिती करण्याची या प्रकल्पाची क्षमता असून हा प्रकल्प कार्यान्वयीत होण्यास अजून बराच कालावधी जाणार आहे.



ठामपा चार हेक्टर जागा भाड्याने घेणार

**कचऱ्यावर प्रक्रिया करण्यासाठी उभारण्यात येणाऱ्या प्रकल्पाला ठिकठिकाणी विरोध होत असल्याने कचरा टाकायचा कुठे असा मोठा प्रश्न सतावतो आहे. ठाणे महापालिकेला अनेक वेळा हरित लवाद, उच्च न्यायालय आणि महाराष्ट्र प्रदूषण मंडळाने वारंवार नोटीस देखील बजावल्या आहेत. त्यामुळे गेल्या काही महिन्यात सत्ताधारी शिवसेना आणि प्रशासनाने हा प्रश्न गांभीर्याने घेत भांडार्ली या ठिकाणी 10 वर्षाच्या करारावर भाडेतत्वावर जागा घेण्याचे निश्चित केले असून यासंदर्भातही प्रस्तावाला बुधवारी झालेल्या सर्वसाधारण सभेत मान्यता देण्यात आली आहे.**

# तिसरी लाट रोखण्यासाठी कोरोनामुक्त गाव स्पर्धेचे आयोजन



**ठाणे :** कोरोनावर मात करण्यासाठी जिल्ह्यातील सर्व ग्रामपंचायतींमध्ये जिद्द निर्माण व्हावी, यासाठी राज्य शासनाने कोरोनामुक्त गाव स्पर्धा राबविण्याचा निर्णय घेतला आहे. या स्पर्धेत आपल्या जिल्ह्यातील सर्व ग्रामपंचायतींनी सहभाग घ्यावा, यासाठी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. भाऊसाहेब दांगडे यांनी बहुतांशी सरपंच व ग्रामसेवकांशी ऑनलाइन संवाद साधत या स्पर्धेची माहिती दिली. कोरोनाची संभाव्य तिसरी लाट रोखण्यासाठी प्रत्येक ग्रामपंचायतीने प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यावर भर देण्याची गरज आहे. त्यासाठी कुटुंब सर्वेक्षण पथक तयार करणे, विलगीकरण कक्षाची स्थापना, कोरोना तपासणीसाठी रुग्णालयात नेणाऱ्या वाहनचालकांचे पथक, कोरोना हेल्पलाइन पथक, लसीकरण पथक आदी पंचसूत्रीनुसार गावात तयारी करण्याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. या नियोजनाची जबाबदारी प्रामुख्याने सरपंच व ग्रामसेवक यांनी घेऊन गाव कोरोनामुक्त ठेवण्यासाठी प्रयत्न करावे. या पंचसूत्रीनुसार काम केल्यास ग्रामपंचायतीला कोरोनामुक्त गाव स्पर्धेत हमखास यश मिळेल, अशी आशाही त्यांनी व्यक्त केली.

**आझादी का अमृत महोत्सव उपक्रम राबवणार**

देशाच्या स्वातंत्र्याला 75 वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने केंद्र शासनातर्फे सुरु असलेल्या 'आझादी का अमृत महोत्सव' हा उपक्रमही प्रत्येक ग्रामपंचायतीत उत्साहाने राबवावा. कोरोना नियंत्रण नियमांचे काटेकोरपणे पालन करून विविध कार्यक्रम ग्रामपंचायतस्तरावर घ्यावेत, असेही दांगडे म्हणाले. यावेळी उपमुख्य कार्यकारी चंद्रकांत पवार यांनी या दोन्ही उपक्रमांची माहिती दिली.

# कल्याण लोकसभा मतदारसंघात चार लाख घरापर्यंत गॅस पुरवठ्याचे नियोजन



**कल्याण :** डोंबिवलीतील रिजन्सी गृहसंकुलातील 100 सदनिकाधारकांना पाईपलाईनद्वारे घरगुती गॅसपुरवठा करण्यात येत आहे. या गॅस पाईपलाईनचा शुभारंभ मंगळवारी कल्याणचे खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या हस्ते करण्यात आला. कल्याण लोकसभा मतदारसंघात दोन टप्प्यात चार लाख घरापर्यंत गॅस पुरवठ्याचे नियोजन असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी शिवसेनेचे पदाधिकारी सदानंद थरवळ, प्रकाश म्हात्रे, माजी नगरसेविका प्रमिला पाटील, सोसायटीचे जयवंत ढाणे आदी उपस्थित होते. रिजेन्सी हे बडे गृहसंकुल आहे.

रिजन्सी गृहसंकुलातील बाराशे सदनिकांना घरगुती गॅस पाईपलाईनद्वारे गॅस पुरवठा केला जाणार आहे. त्यापैकी 100 घरांचा गॅसपुरवठा मंगळवारपासून सुरु झाला आहे. उर्वरित 1100 सदनिकाधारकांनाही लवकर पाईपलाईनद्वारे गॅसपुरवठा केला जाणार आहे. यापूर्वी डोंबिवली निवासी भागातील सदनिकाधारकांना गॅस पाईपलाईनद्वारे गॅस पुरवठा सुरु झाला आहे.

महानगर गॅसची पाईपलाईन कल्याण, डोंबिवली, उल्हासनगर आणि अंबरनाथ परिसरात टाकण्यात आली आहे. कल्याण लोकसभा मतदारसंघात पहिल्या टप्प्यात दोन लाख तर दुसऱ्या टप्प्यात दोन लाख अशा चार लाख घरांपर्यंत पाईपलाईनद्वारे गॅसपुरवठा केला जाणार आहे.

# पावसामुळे नवी मुंबईतील छोट्या व्यावसायिकांचे मोठे नुकसान



**नवी मुंबई :** करोनामुळे लहान व्यावसायिक डबघाईला आलेले असताना मंगळवारी सायंकाळनंतर झालेल्या जोरदार पावसाने त्यांचे प्रचंड नुकसान केले. गणेशोत्सव व हरतालिका असल्याने बाजारात फळे, फुले, पुजेचे साहित्य व्यावसायिकांनी विक्रीसाठी ठेवले होते, मात्र पावसामुळे ते पाण्यात भिजून गेले. त्यात ग्राहकही फिरकला नसल्याने नफा तर सोडाच भांडवल निघाले नाही. गणपती आगमन आणि हरतालिका या सलग दोन दिवसांच्या सणात कोट्यवधींची उलाढाल दरवर्षी होत असते. हरतालिका पूजेला लागणाऱ्या वनस्पती आणि फुले याचा व्यवसाय करणारे या काळात दिवसभरात किमान 40 ते 50 हजार निव्वळ नफा कमावतात. त्यामुळे शिथिल झालेले निर्बंध पाहता त्यांनी मोठ्या उत्साहाने आपली दुकाने थाटली होती. भांडवलापोटी पैसा कसातरी उभारला होता. यातून काही पैसै पदारात पडतील अशी आशा त्यांना होती, मात्र पावसाने त्यावर पाणी फेरले.

हरतालिकेत किमान 21 प्रकारच्या वनस्पतींची व फळांची पूजा मांडण्याची परंपरा आहे. वास्तविक निसर्ग पूजा हा त्यामागील हेतू आहे. नवी मुंबईत या सर्व वनस्पती मिळत नसल्याने बाहेर गावांतून खासकरून नाशिक, पुणे जिल्ह्यांतून मोठ्या प्रमाणात आवक होती. या वनस्पतींचा एकत्रित मिळणारा वाटा अंदाजे 20 ते 50 रुपयांचा असतो. मात्र या वर्षी दर वाढत असून 40 ते 80 रुपयांपर्यंत वाशी बाजारात हा वाटा ठेवण्यात आला होता.

**मात्र मंगळवारी सायंकाळनंतर ऐन व्यवसाय होण्याच्या वेळेत**

**पाऊस सुरु झाला. तो इतका प्रचंड होता की या फेरीवाल्यांचे यात मोठे नुकसान झाले. त्यात ग्राहकही न आल्याने माल पडून होता. त्यामुळे 40 ते 80 रुपयांपर्यंत विकला जाणारा वाटा पावसात भिजल्याने मागेल त्या किमतीत तो विकावा लागला. तर उर्वरित माल फेकून द्यावा लागल्याची व्यथा व्यावसायिकांनी व्यक्त केली.**

# कनिष्ठ महाविद्यालय सुरू करण्याच्या हालचाली



**मुंब्रा :** बेताची आर्थिक परिस्थिती असल्यामुळे ज्या विद्यार्थ्यांचे शालेय शिक्षणाच्या पुढचे महाविद्यालयीन शिक्षण अपूर्ण राहिले आहे. त्यांना ते पूर्ण करता यावे, यासाठी मुंब्र्यात कौसा भागातील एम.एम. व्हॅली परिसरातील ठामपाच्या शाळेतील इमारतीमध्ये कनिष्ठ महाविद्यालय चालू करण्याच्या हालचाली विरोधी पक्षनेते अशरफ ऊर्फ शानू पठाण यांनी सुरु केल्या आहेत. यासाठी लागणाऱ्या मूलभूत सुविधांपैकी एक असलेल्या वर्गखोल्यांची चाचपणी करण्यासाठी त्यांनी मंगळवारी शाळेत जाऊन प्रत्यक्ष पाहणी केली.

येथे कनिष्ठ महाविद्यालय सुरु करण्यात यावे, यासाठी आयुक्तांना पत्र दिले असून अनंत चतुर्थी (गणेश विसर्जन झाल्यावर) नंतर या विषयावर संबंधितांची बैठक आयोजित करण्यात येणार आहे. तसेच शिक्षण अधिकारी आणि अभियंत्यासह लवकरच पुन्हा एकदा शाळेला भेट देऊन येथील एकूण परिस्थितीचा तसेच इमारतीच्या क्षमतेचा अंदाज घेणार असल्याची माहिती पठाण यांनी दिली. येथे महाविद्यालय सुरु झाल्यास फीअभावी ज्या विद्यार्थ्यांचे महाविद्यालयीन शिक्षण अपूर्ण राहिले आहे, त्यांना मोठा दिलासा मिळेल, असा आशावाद त्यांनी यावेळी व्यक्त केला. यावेळी त्याच्याबरोबर राष्ट्रवादीचे काही नगरसेवक आणि नगरसेविका उपस्थित होत्या.

# गौरींसाठी यंदा सोनेरी रंगातील आणि ऑक्साइड दागिन्यांचे आकर्षण

**ठाणे :** गणपती पाठोपाठ रविवारी घरोघरी गौरींचे आगमन होणार असून, गौराईला सजवण्याकरिता यंदा ऑक्साइड दागिन्यांचा ट्रेण्ड बाजारात पहायला मिळत आहे. अत्यंत आकर्षक, सुबक अशा या दागिन्यांच्या खरेदीकरिता महिलावर्गाचा उत्साह पाहायला मिळत आहे.

बाजारपेठ गौरी- गणपतीच्या सजावटीच्या वस्तूंनी सजली आहे. आकर्षक वस्तूंच्या खरेदीसाठी गर्दी झाली आहे. विविध आकारातील गणपती व गौरीच्या मूर्ती, गौरीचे मुखवटे यांच्यासह दागिने, रेडिमेड साड्यांच्या खरेदीसाठी महिलावर्गाची लगबग सुरु आहे. गौरीचे पितळी, शाडू माती आणि पीओपीचे मुखवटे बाजारात उपलब्ध आहेत. सुबक आकारातील आखीव-रेखीव मुखवटे साऱ्यांचे लक्ष वेधून घेत आहेत. गौरीसाठी लागणारा दागिन्यांचा साज लक्ष वेधून घेणारा आहे. सोनेरी रंगातील दागिने आणि ऑक्साइड दागिने यंदा आकर्षण ठरले आहेत. ऑक्साइड दागिन्यांना महिलावर्गाची पसंती आहे. गौरीच्या सजावटीच्या वस्तूंच्या दरात 10 टक्क्यांची वाढ झाल्याची माहिती विक्रेते स्वप्निल तंटक यांनी दिली. दागिन्यांमध्ये मोहनमाळ, ठुशी, बोरमाळ, लक्ष्मीहार, चपला हार, मोत्याचे सर, कोल्हापुरी साज, चंद्राचे मंगळसूत्र, कमरपट्टा, मुकुट, बाजूबंद, झुमके, जुडापीन, कानातील झुबे, वेल, पूर्ण कानवेल आदी पारंपरिक पद्धतीचे वैविध्यपूर्ण अलंकार पहायला मिळतात. मंगळसूत्रातही विविध प्रकार उपलब्ध आहेत. हे दागिने साधारण 200 रुपयांपासून उपलब्ध आहेत. पाचवारी आणि नऊवारी या दोन्ही प्रकारात रेडिमेड साड्या उपलब्ध आहेत. इमिटेशन ज्वेलरीकडे महिलावर्गाचा कल असल्याचे तंटक म्हणाले.



**गणपतीसाठीही सजावटीचे दागिने**

यंदा गणरायासाठी सोन्याचे केळीचे झाड आले आहे. या झाडाला चांगलीच मागणी असल्याचे सोन्या-चांदीचे व्यापारी कमलेश जैन म्हणाले. त्याचबरोबर गजंतलक्ष्मी, मूषक, मोदक, आंब्याचे पान, अष्टविनायक पान, मोत्यांच्या मण्यांच्या बाली, मुकुट, शाल, नेकलेस, शेला, कमळाचे फूल, जास्वंद फूल, मोदकाचे नेकलेस, दुर्वा हेदेखील विक्रीसाठी आहेत. सोने, चांदी आणि इमिटेशन ज्वेलरी बाजारात उपलब्ध आहे.




# केवडा होतोय दुर्मिळ, गणेश उत्सवात असते जास्त मागणी

**ठाणे :** केवडा याला वर्षभर कोणी विचारत नसले तरी गणपती मध्ये मात्र याचा भाव वधारलेला असतो. काल पासून याचा भाव वाढला असून जी पाती 10 रुपयाला मिळते तीच पाती चक्क 500 रुपयेही कमवून देऊ लागली आहे. कारण गणपतीच्या पूजेला याचे अनन्यसाधारण महत्व आहे . परंतु दुर्मिळ असा केवढा आता दुर्मिळ होऊ लागला आहे.

गणेशोत्सवात जसा दुर्वा, जास्वंद या फुलांना मान असतो तसाच मान हा केवड्याला पण असतो . गणेश,गौरी पूजनासाठी लागणारा केवड़ा दुर्मिल झाल्याने पूजे साठी लागणार्या केवड्या वीना मुर्त्यांची विधिवत पूजा करावी लागणार आहे. त्यामुळे भाविका नाराज झाले आहेत. पश्चिम किनार्यावरील कोरे, एडवन, केळवा, माहीम, चिंचणी बोर्डी आणि विक्रमगड तालुक्यातील काही भागात नैसर्गिकरित्या उगवलेला केवडा मिळत आहे. परंतु आता धूपप्रतिबंधित असलेली हि झाडे कापून टाकल्याने कमी होऊ लागली आहेत. केवड्याला अत्तरासाठीही मोठी मागणी असते.

हिंदूच्या धार्मिक कार्यात देव-देवतांच्या पूजेला महत्वाचे स्थान आहे. परंपरेनुसार प्रत्येक देवाला विशिष्ट प्रकारची पाने, व फुले वाहण्याची प्रथा आहे. गणपतीला दुर्वा, जास्वंदी फूल, केवडा वाहिला जातो. तर गौरीला मोगर्याची फणी, गजरा, केवड़ा वाहिला जातो. गणेशोत्सव व गौरीचा सण सुरु होणार आहे. मात्र केवड़ा मिळत नसल्याने केवडयावीणा गौरी-गणपतीची पूजा करावी लागणाऱ असल्याने भाविक नाराज झाले आहेत.

# स्वच्छतेबाबत नवी मुंबई पालिकेला जनप्रतिसाद कमी



**नवी मुंबई :** कोट्यवधी रुपये खर्च करून केंद्र सरकारच्या स्वच्छ भारत अभियानात सक्रिय भाग घेणाऱ्या नवी मुंबई पालिकेला इंदूर, सुरत या शहरांच्या तुलनेत नागरिकांचा कमी प्रतिसाद मिळत असल्याचे आढळून आले आहे. गेली चार वर्षे सातत्याने देशात पहिला क्रमांक पटकविणाऱ्या इंदूरमधील प्रत्येक नागरिक हा इतर सुविधांमध्ये मागे असला तरी स्वच्छतेबाबत जागरूक झाला आहे. त्यामुळे या शहराला पहिला क्रमांक पटकविताना मानांकन कमी पडत नसल्याचे दिसून येत आहे. घनकचरा वर्गीकरणात आजही नवी मुंबईतील ग्रामीण व झोपडपट्टी भाग हा कमी पडत असून इंदूरमध्ये हे काम प्रत्येक नागरिक हिरिरीने करीत आहे.

नवी मुंबई गेली अनेक वर्षे राज्यात स्वच्छतेबाबत अव्वल आहे. सिडकोने नियोजनबद्ध तयार केलेल्या या शहरात नवी मुंबई पालिकेने चांगली देखभाल करण्याचा प्रयत्न केला आहे. त्यामुळे देशातील चार हजारपेक्षा जास्त शहरांच्या स्पर्धेत गेल्या वर्षी नवी मुंबईला तिसरा क्रमांक मिळालेला आहे. यामुळे हे शहर राज्यात पहिल्या क्रमांकावर आहे. इंदूर व सुरत या दोन शहरांची स्पर्धा करणाऱ्या नवी मुंबईने यंदा पहिला क्रमांक मिळविण्यासाठी कंबर कसली होती. करोनासारखी जीवघेणी साथ असताना स्वच्छ भारत योजनेची मागील वर्षीच्या ऑक्टोबरपासून सुरुवात केली आहे. या स्पर्धेत पहिला क्रमांक पटकाविण्यासाठी पाण्याचा वापर, घनकचरा व्यवस्थापन आणि सौंदर्यीकरण हे तीन निकष महत्त्वाचे असून त्यांना मानांकन दिले जात आहे. पाण्याचा वापर या प्रकारात केंद्रीय नागरी मंत्रालयाच्या पथकाला नवी मुंबईला वगळता आलेले नाही. देशात सांडपाणी प्रक्रिया राबवणारी नवी मुंबई पालिका एकमेव आहे. या शहरातील सांडपाण्यावर शास्त्रोक्त प्रक्रिया केली जात असल्याने त्याचा पुनर्वापर केला जात आहे. हे देशातील इतर कोणत्याही शहरात घडताना दिसून येत नाही. त्यामुळे वॉटर पल्स या मानांकनात नवी मुंबई पालिका टिकून राहिलेली आहे मात्र पुढील दोन निकषांत पालिका मागे पडत असून यात जनतेचा प्रतिसाद या प्रकारात नवी मुंबईकर उदासीन असल्याचे पुन्हा एकदा सिद्ध झाले आहे.

**शहर आपलेसे वाटत**

नवी मुंबईतील ग्रामीण भागातील जनतेला या स्वच्छ भारत अभियानाविषयी काहीही देणे घेणे नाही असा आव आहे. त्यामुळे प्रत्येक गावातील नागरिकाची स्वच्छतेबाबत भिन्न मते आहेत. झोपडपट्टी भाग हा ग्रामीण भागापेक्षा जास्त जागरूक आहे तर शहरी भागातील जनतेला हे शहर आपलेसे वाटत नाही असे दिसून आले आहे. त्यामुळे नवी मुंबईला पहिला क्रमांक मिळालाच पाहिजे यासाठी नवी मुंबईकर हिरिरीने पुढाकार घेत असल्याचे आढळून आलेले नाही. लोकांच्या प्रबोधनावर पालिका लाखो रुपये खर्च करीत असून अठरापगड जातीच्या या शहरात शहराविषयी आपलेपणा नसल्याने हा विरोधाभास कायम राहणार असल्याचे पालिकेतील काही वरिष्ठ अधिकाऱ्यांनी सांगितले.

# ऐन पावसात भात पीक खराब होण्याची भीती



**कल्याण :** ठाणे जिल्ह्यातील अंबरनाथ, शहापूर तालुक्यांतील शेतकऱ्यांना कृषी विभागाकडून जून महिन्यात देण्यात आलेले कोईम्बतूर-51 वाणाचे भात पीक अवघ्या 50 ते 60 दिवसांत फुलल्याने ऐन पावसात हे पीक ठेवायचे कोठे, असा प्रश्न शेतकऱ्यांना पडला आहे. या वाणाचे पीक साधारणपणे 120 दिवसांत फुलते. त्यामुळे दसरा-दिवाळीच्या काळात शेतकरी या पिकाची कापणी करतो. लागवड केल्यापासून अवघ्या दीड महिन्यातच हे पीक आल्याने पेरणी, कापणीचे गणित विस्कटले आहे, अशा तक्रारी शेतकऱ्यांकडून केल्या जात आहेत.

अंबरनाथ आणि शहापूर या दोन्ही तालुक्यांतील 825 एकर भात जमिनीवर यंदा कोईम्बतूर-51 वाणाची लागवड करण्यात आली आहे. येथील शेतकरी पावसाचा अंदाज घेऊन अनेक वर्ष दसरा-दिवाळीच्या दरम्यान तयार होणारी भात पिके घेतो. या कालावधीत पावसाचे प्रमाण कमी झालेले असते. दसऱ्यानंतर पाऊस कमी झाल्याने शेतात तयार झालेला भात ठेवण्यासाठी घराच्या परिसरात, माळरानावर खळी करणे शेतकऱ्यांना शक्य होते. मागील पाच ते सहा वर्षांपासून माघारी परतणारा पाऊस ऑक्टोबर, नोव्हेंबरपर्यंत पडत असतो. परतणारा पाऊस लांबत असल्याने शेतकरी नीम गर्वी, गर्वी (90 ते 120 दिवसाची भातपिके) पिके घेण्याकडे वळला आहे.

जिल्हा परिषदेच्या कृषी विभागाने महाबीज बियाणे महामंडळाकडून कोईम्बतूर-51 भात वाणाचे बियाणे जिल्हा परिषदेला उपलब्ध करून दिले. हे पीक 110 ते 120 दिवसांत फुलोऱ्यावर (लोंगवा) येणार असल्याने जिल्हा परिषदेच्या कृषी विभागाने ग्रामपंचायतींमार्फत शेतकऱ्यांचे सातबारा उतारा पाहून शहापूर, अंबरनाथ तालुक्यातील शेतकऱ्यांना कोईम्बतूर-51 बियाण्याचे वाटप जूनमध्ये केले, अशी माहिती ठाणे जिल्हा परिषदेच्या कृषी विभागाचे सभापती संजय निमसे यांनी दिली. जूनमध्ये पाऊस सुरु होताच शेतकऱ्यांना कोईम्बतूर -51 बियाण्यांचे राब तयार केले. हे पीक लावणीच्या वेळीच्या 120 दिवसांत तयार होणार असल्याने गर्वी जागेत लावले. दमदार पाऊस, हवामान त्यामुळे यावर्षी जोरदार पीक येईल, या आशेवर शेतकरी होता. कोईम्बतूर-51 वाणाची लागवड केलेल्या शेतकऱ्यांच्या शेतामधील भाताला 50 दिवसांत दाणे आले आहे. सध्या मुसळधार पाऊस सुरु आहे. शेतामध्ये गुडघाभर पाणी, चिखल आहे. पाऊस सप्टेंबर-ऑक्टोबरपर्यंत पडण्याची शक्यता असल्याने शेतात तयार झालेले कोईम्बतूर-51 भात कापून ठेवायचे कोठे, असा प्रश्न शेतकऱ्यांना पडला आहे. दरवर्षी माघारी जाणारा पाऊस लांबत असल्याने तयार भात पिकांचे नुकसान होते. यावर्षी पाऊस वेळेत माघार घेऊन दमदार पीक येईल, या आशेवर शेतकरी होता. तयार पीक विहित मुदतीच्या आत तयार झाल्याने त्या पिकाचे करायचे काय, असे प्रश्न शेतकऱ्यांना पडलेत अशी माहिती शेणवे येथील वसंत वरकुटे या शेतकऱ्याने दिली.

# गॅस दरवाढीमुळे पोळी-भाजी केंद्रांना स्वयंपाकाचा खर्च परवडेना

**ठाणे :** घरगुती आणि व्यावसायिक वापरातील सिलिंडरच्या किमतीत सातत्याने होणाऱ्या दरवाढीमुळे सर्वसामान्य कुटुंब मेटाकुटीला आली असताना खानावळ किंवा पोळी भाजी केंद्र चालवण्याचा व्यवसाय करणाऱ्यांचीही आर्थिक कोंडी झाली आहे. त्याचवेळी वाढलेल्या गॅस सिलिंडर दरांमुळे स्वयंपाकाचा खर्चही परवडेनासा झाला आहे.

मुंबई, ठाणे आणि आसपासच्या शहरांत खानावळी तसेच पोळी-भाजी विक्री केंद्रांचे मोठे जाळे पसरले आहे. या शहरांतील श्रमिक, मजूर तसेच घरांपासून दूर राहणारे विद्यार्थी, नोकरदार यांना अशा खानावळींचा आधार असतो. करोना टाळेबंदीपासून या व्यवसायाला ग्रहण लागले आहे. आता व्यवहार सुरळीत होण्याची आशा असतानाच महागाईने या व्यावसायिकांना जेरीस आणले आहे. त्यातही गॅस सिलिंडरच्या दरवाढीचा मोठा फटका या व्यावसायिकांना बसत आहे. मार्च महिन्यात घरगुती आणि व्यावसायिक सिलिंडरच्या दरात वाढ झाल्याने खानावळ आणि पोळी-भाजी केंद्रचालकांनी थाळीमागे 10 ते 15 रुपयांची वाढ केली होती. मागील पाच महिन्यांमध्ये घरगुती सिलिंडरच्या दरात 90 रुपयांनी तर व्यावसायिक सिलिंडरच्या दरात तब्बल 150 रुपयांनी वाढ झाली आहे. घरगुती उपयोगात येणारे 14 किलो वजनी गॅस सिलिंडर सध्या 880 रुपयांना मिळत आहे, तर व्यावसायिक वापरासाठी असलेले 19 किलो वजनी सिलिंडर तब्बल 1 हजार 650 रुपयांना मिळत आहे. काही मोठ्या पोळी-भाजी केंद्रांना आठवड्याला तीन व्यावसायिक सिलिंडर लागतात, तर काही लहान खानावळधारकांना 15 दिवसाला तीन सिलिंडरची गरज भासते. पोळी-भाजी केंद्रचालकांचा केवळ सिलिंडरचा खर्च हा महिन्याकाठी काही हजारांच्या घरात जातो. या खर्चात मागील काही महिन्यांपासून मोठी भर पडली आहे. जमा-खर्चाचा ताळमेळ बसविण्यासाठी मार्च महिन्यात सर्व पोळी-भाजी केंद्रचालकांनी त्यांच्या शाकाहारी आणि मांसाहारी थाळींच्या किमतीत वाढ केली होती.

'मागील वेळी जेवणाच्या किमतीत वाढ केली असता ग्राहकांनी आमची अडचण समजून घेतली होती. आता पुन्हा जेवणाच्या किमती वाढविल्यास आमचा दैनंदिन ग्राहक निघून जाईल आणि त्यामुळे येणारी आर्थिक समस्या ही फार मोठी असेल,' असे मत ठाण्यातील काही पोळी-भाजी केंद्रचालकांनी व्यक्त केले. तर काही छोट्या खानावळ चालविणाऱ्या महिलांनीदेखील ग्राहक टिकवून ठेवण्यासाठी भाववाढ केली नसल्याचे सांगितले. पोळ्या आणि भाकरींसाठी चूल एक उत्तम पर्याय आहे. शहरात जागेअभावी चूल मांडावी कुठे आणि त्यासाठी लागणारी लाकडे दररोज आणावी कुठून, असा सवाल काही खानावळधारकांनी उपस्थित केला.




**महागाईच्या फेऱ्यात**

**केवळ गॅस सिलिंडरच नव्हे तर इंधन दरवाढीचा फटकाही पोळीभाजी केंद्रचालकांना बसत आहे. इंधन दरवाढीमुळे भाज्या, खाद्यतेल, डाळी यांचे दर वाढले आहेत. त्यातच टाळेबंदीमुळे व्यवसायाचे गणित बिघडले आहे, असे हे व्यावसायिक सांगतात.**

DAILY THANEVAIBHAV RNI REGD NO. 27878/ 75, POSTAL NO. THC/186/2018-2021





**गणपती बाप्पा मोरया!**
गणेशोत्सवानिमित्त 10 सप्टेंबर रोजी 'ठाणेवैभव' कार्यालयास सुट्टी असल्याने शनिवार 11 रोजी अंक प्रकाशित होणार नाही, याची दखल घ्यावी. वाचक, जाहिरातदार आणि हितचिंतकांना गणेशोत्सवाच्या शुभेच्छा!
-संपादक


www.thanevaibhav.in

# ठाणेवैभव

ठाणे जिल्ह्याचे सर्वाधिक खपाचे परिपूर्ण दैनिक | इष्ट ते छापणार | संस्थापक : नरेन्द्र बल्लाळ





मीरा-भाईंदर वैभव विशेष
➤➤पान ५ वर

भारतीय सौर दिनांक भाद्रपद १९ शके १९४४ | वर्ष ४७ | अंक १७ | शुक्रवार १० सप्टेंबर २०२१ | पाने ८ | रु. ४ | संपादक : मिलिन्द बल्लाळ

# निर्बंधमुक्त...निर्विघ्न!



(छाया- गजानन हरिमकर)

## ठाण्यात दीड लाख श्रीमूर्तींची प्राणप्रतिष्ठापना

**ठाणे:** गेल्यावर्षी कोरोनामुळे उत्सव नीट साजरा करता न आल्याने आणि यंदा गणेशोत्सव निर्बंधमुक्त असल्याने ठाण्यात गणेश भक्तांचा उत्साह ओसंडून वाहत आहे. हा उत्सव सामाजिक आणि आरोग्य विषयक भान ठेवून साजरा करण्याचे आवाहन प्रशासनाने केले आहे.

ठाणे शहरासह कल्याण,डोंबिवली, उल्हासनगर, भिवंडी, अंबरनाथ, बदलापूर या शहरात 10 सप्टेंबरला म्हणजे गणेश चतुर्थीच्या दिवशी सुमारे दीड लाख

➤➤पान ४ वर

## बारवी धरण अखेर भरले

### ठाणे जिल्ह्याची पाणी समस्या दूर

**अंबरनाथ:** ठाणे जिल्ह्याची तहान भागवणारे बारवी धरण अखेर 100 टक्के भरुन वाहू लागले आहे. धरणाच्या 11 स्वयंचलित दरवाज्यापैकी नऊ दरवाज्यांतून पाण्याचा विसर्ग सुरु झाला आहे.

जुलै-ऑगस्टमध्ये दमदार पडणाऱ्या पावसाने काही दिवस दडी मारल्याने यंदा बारवी धरण भरण्यास थोडा जादा कालावधी लागला. मात्र सप्टेंबरच्या पहिल्याच आठवड्यात जोरदार पर्जन्यवृष्टी झाल्याने 8 सप्टेंबरला रात्री उशिरा धरण भरुन ओव्हर फ्लो झाले.

बारवी धरणाची उंची 72.60 मीटर असून धरणात 340 एमसीएम पाणीसाठा उपलब्ध आहे. या धरणातून उल्हासनगर, कल्याण डोंबिवली, ठाणे, भिवंडी, मीरा-भाईंदर या महानगरपालिकांप्रमाणे एमआयडीसी आणि स्टेम प्राधिकरणाला पाणीपुरवठा केला जातो. बारवी पूर्ण क्षमतेने भरल्याने ठाणे जिल्ह्याची पाणी समस्या आता दूर झाली आहे.

दुष्काळात तेरावा...

# राज्याकडून कर्ज घेऊनच ठाण्यात अंतर्गत मेट्रो



**ठाणे :** ठाणे महापालिकेकडे पगार देण्यासाठीही पुरेसा निधी नसताना अंतर्गत मेट्रोचे काम महापालिकेला राज्यकडून कर्ज घेऊनच करावे लागणार आहे. अंतर्गत मेट्रोसाठी केंद्र आणि राज्य सरकार प्रत्येकी 16.65 टक्के आर्थिक मदत देणार आहे. मात्र ती कर्ज स्वरुपातच असेल.

मुख्य मेट्रो -4 मार्ग हा ठाणे शहरातून जात असल्याने या मार्गाला जोडण्यासाठी तत्कालीन पालिका आयुक्त डॉ. संजीव जयस्वाल यांच्या कार्यकाळात अंतर्गत मेट्रोची आखणी करण्यात

➤➤पान ४ वर

**अंतर्गत मेट्रो प्रकल्प कार्यान्वित झाल्यानंतर त्यातून मिळणाऱ्या उत्पन्नातून कर्जाचा भार हलका केला जाऊ शकतो असा दावा प्रशासनाने केला असला तरी ठाण्यातील किती टक्के नागरिक अंतर्गत मेट्रोचा वापर करतील यावर सारे अवलंबून आहे, त्यामुळे तूर्त हा प्रकल्प म्हणजे दुष्काळात तेरावा महिना ठरू नये अशी अपेक्षा ठाणेकर व्यक्त करीत आहेत.**

## ठाण्यातील या गणेश भक्ताच्या घरात आहेत हजाराहून अधिक मूर्ती



**ठाणे:** ठाण्यातील एका अवलियाने आपल्या घरात शेकडो गणेशमूर्तींचे संकलन करुन अनोखा छंद जोपासला आहे. दिलीप वैती असे या कलाकाराचे नाव असून यासाठी त्याचे घरच बाप्पामय बनले आहे. देश-विदेशातील हजारोंच्या वर मूर्ती त्यांच्या घरात विराजमान झाल्या आहेत.गेली 33 वर्षे त्यांचा हा शिरस्ता सुरु असून भविष्यात सृष्टी गणेशा या उपक्रमाद्वारे देववृक्षाची लागवड करून पर्यावरण संवर्धनाचा मानस व्यक्त केला आहे.

ठाण्यातील राबोडी भागात राहणारे दिलीप वैती कुठलेही व्रतवैकल्य अथवा उपासतपास करीत नाहीत. तरीही त्यांच्यात गणेशभक्ती ओतप्रोत भरलेली आहे. त्यांच्या घरी पूर्वजांचा नवसाचा गणपती पुजला जात असे. याच प्रेरणेतून वयाच्या 17 व्या वर्षी 1989 साली त्यांनी मुंबईतील प्रदर्शनातून पॉकेटमनी खर्चून शिळेची पहिली गणेशमूर्ती घरात आणली. वैती सांगतात, याच पहिल्या मूर्तीवरुन घरात त्यांना बरीच बोलणी खावी लागली. मात्र,कालांतराने संपूर्ण घरच गणेशमय झाल्याने वैती कुटुंबाची

➤➤पान ४ वर

उद्घाटनानंतर ४८ तासात पडला खड्डा

# कोपर'खड्डा'!

**डोंबिवली :** तब्बल दोन वर्षाच्या प्रतीक्षेनंतर पूर्व-पश्चिम शहराला जोडणारा कोपर पुल 7 सप्टेंबर रोजी वाहतुकीसाठी खुला झाला. मात्र दोन दिवसांत पुलावर खड्डा पडल्याने प्रशासनाने एवढी घाई करत पूल का सुरु केला असा प्रश्न मनसेने उपस्थित केला आहे.

आमदार प्रमोद ( राजू ) पाटील यांनी मंगळवारी पुलावरील खड्ड्यांची पाहणी केल्यानंतर पूलावर 48 तासाच्या आता खड्डे पडल्याबद्दल आश्चर्य व्यक्त केले आणि पालिका प्रशासनावर ताशेरे ओढले आहेत. कोपर पुल वाहतुकीसाठी सुरु

➤➤पान ४ वर

### कोपर पुलावरील खड्डा माध्यमावर गाजला

**कोपर पूल सुरु झाल्याने ज्या नागरिकांनी आनंद व्यक्त केला, त्यांच्यासह अनेकांनी या खड्ड्याचा फोटो फेसबुक, व्हॉट्सअपवर टाकला. `नेहमीप्रमाणे करून दाखवले`, `डोंबिवलीमधील कोपर पुलावरील पहिल्या खड्ड्याच्या सगळ्यांना शुभेच्छा अशी खिल्ली मनसैनिकांनी सामाजिक माध्यमांवर उडवली आहे.**










# कोलशेतमध्ये हळहळ, संताप; हनुमंत शेळके यांची निर्घृण हत्या



**ठाणे :** ठाण्यातील एका पेंटर ठेकेदाराचे पाच जणांनी अपहरण करून त्याची हत्या करत त्याच्या घराच्या बाजूलाच असलेल्या मोकळ्या जागेत मृतदेह पुरला. या घटनेने कोलशेत परिसरात हळहळ आणि संताप व्यक्त होत आहे.

अपहरण करून खंडणीसाठी फोन करणाऱ्या पाच आरोपींपैकी दोघा आरोपीना पोलिसांनी बेड्या ठोकल्या आहेत. तर तीन फरार आरोपींच्या मागावर पोलीस पथक असल्याची माहिती परिमंडळ-5 चे पोलीस उपायुक्त विनय राठोड यांनी दिली.

शेळके कुटुंबीयांनी कापूरबावडी पोलीस ठाण्यात 2 सप्टेंबरला मृतक हनुमंत शेळके मिसिंग झाल्याची तक्रार केली. त्यानंतर 6 सप्टेंबर रोजी बेपत्ता झालेल्या शेळके यांच्या मोबाईलवरून आरोपींची शेळके यांचे भागीदार संतोष पाटील याना फोन करून खंडणीची मागणी केली. याबाबत कापूरबावडी पोलिस ठाण्यात कलम 363, 384, 387, 364(ए), 120(ब) नुसार गुन्हा दाखल केला. माहिती दिल्यानंतर पोलिसांचा तपास सुरु झाला. पोलिसांनी बनावट नोटांचे सहा लाख घेऊन सांगितलेल्या ठिकाणी पैसे घेऊन गेले. मात्र वारंवार जागा बदलून आरोपीना संशय आल्याने खंडणीची रक्कम घेण्यास कुणीही आलेच नाही. पोलिसांनी तांत्रिक तपासद्वारे पोलिसांनी आरोपी शिव रामलाल वर्मा(24) महादेव मित्र मंडळ, ईश्वर नगर, आनंदनगर, दिघा नवीमुंबई याला 8 सप्टेंबरला अटक करून जांभळी नाका येथून अटक केली. तर दुसरा आरोपी सुरज श्रीराम वर्मा(22) रामपदारत पूर्वी चाल, जमहाराष्ट्र नगर कोळशेवाडी कल्याण पूर्व येथून अटक केली. आणि मृतक हनुमंत शेळके यांचे अपहरण आणि हत्या करून कोलशेत येथेच पुरल्याचा गुळगाडा झाला. त्यांचे तीन साथीदार जे मृतक शेळके यांच्या सोबत काम करीत होते. ते फरार झाले असून त्यांच्या मागावर पोलीस पथक असल्याची माहिती पोलीस उपायुक्त विनय राठोड यांनी दिली.

भरपूर पैसे कमवण्याच्या हेतूने शेळके या रंगारी ठेकेदाराचे अपहरणाचा डाव रचला. त्यानुसार 1 सप्टेंबर रोजी अपहरण केले. त्याच्या अंगावर असलेले सहा ते सात तोळ्याचे दागिने काढून घेतले आणि गळा दाबून हत्या केली. त्यानंतर 1 सप्टेंबरच्या मध्यरात्रीनंतर दीड ते दोन वाजण्याच्या सुमारास मोकळ्या जागेत कोलशेत येथे हनुमंत शेळके यांचा मृतदेह पुरुन पसार झाले. काही दिवस मिसिंग राहू द्या त्यानंतर त्याच्या कुटुंबियांकडून खंडणीची मागणी करु असा मनोदय आरोपींचा होता. म्हणूनच त्यांनी मृतक शेळके यांचा भागीदार पाटील याला फोन केला. त्यासाठी आवाज ओळखू नये म्हणून नव्या दोन आरोपी शिव आणि सुरज यांची मदत घेतली असल्याची कबुली आरोपीनी तपासात दिली.

मृतक हनुमंत शेळके यांच्या मोबाईलवरून आरोपींची त्यांचा पार्टनर संतोष पाटील रा. वरचा गाव, कोलशेत, ठाणे याच्या मोबाईलवर खंडणीसाठी फोन करून 15 लाखाची मागणी केली. तेव्हा 6 सप्टेंबरला शेळके यांचे अपहरण झाल्याचे समोर आले. कापूरबावडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला. पोलिसांनी फोनवर संपर्क सुरु ठेवला. एवढे पैसे नाहीत. सहा लाख आहे. असे सांगताच ते घेऊन या म्हणून नवीमुंबई रबाळे परिसरात बोलावले. पोलिसांनी नकली नोटा घेऊन पाठविले, सांगितलेल्या जागेवर बॅग ठेवली. त्यानंतर आरोपींनी जागा बदलल्या. अखेर संशय आल्याने रक्कम घेण्यास कुणी आलेच नाही. यामुळे पोलिसही बुचकळ्यात पडले. त्या दरम्यान आरोपींची एक चूक झाली. अन त्याच आधारे तांत्रिक तपासद्वारे पोलीस हे आरोपी शिव रामलाल वर्मा आणि सुरज श्रीराम वर्मा यांच्यापर्यंत पोहचले. दोघेही शेळके यांच्याकडे काम करीत नव्हते. दोघांना ताब्यात घेऊन कसून चौकशी केल्यानंतर अपहृत हनुमंत शेळके यांचे अपहरण झाले आणि त्यांची हत्या करून त्यांचा मृतदेह त्याच दिवशी 1 सप्टेंबर मध्यरात्रीनंतर पुरण्यात आल्याची कबुली दिली. अन्य फरारी तीन आरोपींच्या नावाचाही उलगडा पोलिसांना झाला. पोलिसांनी मृतदेह उकरून काढण्याची कायदेशीर प्रक्रिया राबवून गुरुवारी सकाळीच तहसीलदार, स्थानिक नगरसेवक, आणि वैद्यकीय अधिकारी यांच्या उपस्थितीत मृतदेह बाहेर काढला.

तिघांच्या मागावर पोलीस पथक ठाणे पोलिसांनी दोघा अटक आरोपींची दिलेल्या माहितीनुसार हनुमंत शेळके हे कलर पेंटिंगचे मोठे ठेकेदार होते. त्यांच्याकडून खंडणी उकळण्याचा प्लॅन होता. त्यानुसार त्यांनी 1 सप्टेंबरला हनुमंत शेळके याना फोन करून मित्राच्या नातेवाईक आजारी आहे. त्याला पैशाची गरज नाही. ते घेऊन ये असे सांगितले. त्यानंतर शेळके यांनी आपल्या पत्नीला सांगून कोलशेत बसस्टॉप येथे आल्यानंतर त्यांचे अपहरण त्यानंतर हत्या आणि मध्यरात्रीनंतर मृतदेह पुरला असल्याची माहिती अटक आरोपींची दिली. फरारी तिघेही हे हनुमंत शेळके यांच्याकडे कामाला होते. ते फरार झाले. त्यांच्या मागावर पोलीस पथक आहे. तांत्रिक तपासाच्या आधारावर आणि आरोपींची केलेल्या चुकीमुळे पोलीस पथक हे दोन आरोपी पर्यंत पोहचले. त्यानंतर या मिसिंगच्या नोंदीचा खुलासा झाला. शेळके यांचे ज्या रात्री अपहार झाले त्याच रात्री हत्या करून मध्यरात्रीनंतर मृतदेह बाजूच्याच कोलशेत परिसरात पुरला. अन्य तीन आरोपींची नवे निष्पन्न झालेली आहेत. त्यांना अटक करण्यासाठी पोलीस पथक रावण झालेले आहे. त्यांच्याकडेच मृतकाच्या अंगावरील दागिने आहेत. लवकरच फरारी तिघे आरोपीना अटक होईल, असा विश्वास परिमंडळ पाचचे उपायुक्त विनय राठोड यांनी व्यक्त केला.

# ठाण्यात रुग्णसंख्या ८५; सबुरीने वागण्याचा सल्ला

**ठाणे:** शहरातील कोरोना रुग्णसंख्या झपाट्याने वाढत असून 85 नवीन रुग्णांची भर पडली आहे. ही ठाणेकरांसाठी धोक्याची घंटा असून गणेशोत्सव दरम्यान ठाणेकरांनी कोरोना नियमांचे पालन केले नाही तर पुन्हा लॉकडाऊनचा सामना करावा लागण्याची शक्यता आहे.

महापालिका हद्दीतील कोरोना हॉट स्पॉट असलेल्या माजिवडे-मानपाडा, नौपाडा-कोपरी आणि वर्तकनगर या प्रभाग समिती क्षेत्रात अनुक्रमे 27, 19 आणि 17 रुग्णांची भर पडली आहे. 11 रुग्ण उथळसर प्रभाग समिती येथे वाढले आहेत. कळवा परिसरात सहा आणि लोकमान्य सावरकरनगरमध्ये दोन रुग्णांची नोंद झाली आहे. प्रत्येकी एक रुग्ण दिवा आणि वागळे प्रभाग समिती भागात नोंदवले गेले आहेत तर सर्वात कमी शून्य रुगणांची नोंद मुंब्रा प्रभाग समिती येथे झाली आहे.

विविध रुग्णालयात आणि घरी उपचार घेत असलेल्या रुग्णांपैकी अवघे 46जण कोरोनामुक्त झाले असून आत्तापर्यंत एक लाख 35 हजार 88 ठाणेकर बरे झाले आहेत. रुग्णालयात आणि घरी 623 नागरिकांवर उपचार सुरु आहेत. आज एकाही रुग्णाचा मृत्यू झाला नसून आत्तापर्यंत दोन हजार 85जण दगावले आहेत.

महापालिका प्रशासनाने काल शहरातील तीन हजार 291 जणांची कोरोना चाचणी घेतली होती. त्यामध्ये 85 नागरिक बाधित मिळाले आहेत. आत्तापर्यंत 19 लाख 36 हजार 188 ठाणेकरांची चाचणी घेण्यात आली असून त्यामध्ये एक लाख 37 हजार 796जण बाधित सापडले.

पान ३ वरुन

## निर्बंधमुक्त...निर्विघ्न!

बाप्पांच्या मूर्तींचे विधीवत प्राणप्रतिष्ठापना होणार आहे. यामध्ये घरगुती 1 लाख 41 हजार 20 तर 1 हजार 58 सार्वजनिक बाप्पांचे वाजगाजत आगमन होणार आहे.

दरम्यान गणेशोत्सव हा साध्या पध्दतीने साजरा करावा, असे शासनाकडून सांगण्यात आले आहे. मिरवणूक आणि विसर्जनाला काही निर्बंध घालण्यात आले आहेत. त्यातच यंदा कोरोनाचा प्रादुर्भाव कमी असल्याने महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ आणि रेल्वे प्रशासनाने मोठ्या प्रमाणात कोकणात जाणाऱ्या चाकरमान्यांसाठी गाड्यांची व्यवस्था केली आहे. त्यातच खासगी गाड्या घेऊन जाणाऱ्यांसाठी टोल फ्री पासचे वाटप करणे सुरु आहे. त्यातच ठाणे शहर पोलिसांच्या माहितीनुसार त्या आयुक्तालयाच्या पाच परिमंडळात एकूण 1 लाख 42 हजार 78 बाप्पांच्या मूर्तींची प्राण प्रतिष्ठापना होणार आहे. यामध्ये दीड दिवसांचे 38 हजार 373, पाच दिवसांचे 49 हजार 782, सात दिवसांचे 13 हजार 318, दहा दिवसांचे 34 हजार 564 तर एकवीस दिवसांचे 86 बाप्पा घरगुती आणि सार्वजनिक मंडळात त्या- त्या दिवसांसाठी विराजमान होणार आहेत. आरोग्यमंत्री राजेश टोपे यांनी कोणतेही निर्बंध नसल्याचे जाहीर केले आहे, मात्र कार्यक्रमांच्या ठिकाणी गर्दी होणार नाही, नागरिक मास्कचा वापर करतील व सामाजिक अंतराचे पालन होईल याकडे जनतेने लक्ष द्यावे, असे आवाहन करण्यात आले आहे. श्रींचे आगमन व विसर्जन यांचे मिरवणूक काढू नये. विशेषतः लहान मुले व ज्येष्ठ नागरिकांनी विसर्जनस्थळी जाऊ नये. शासनाने दिलेल्या मार्गदर्शक सुचनांचे पालन करणे बंधनकारक आहे. ही बंधने पाळून सर्वांनी श्री गणेशाचा उत्सव चांगल्या पद्धतीने व शांततेत साजरे करावे असे आवाहन जिल्हाधिकारी राजेश नार्वेकर यांनी केले आहे.

उल्हासनगर शहरासह अंबरनाथ, बदलापूर या परिसरात सर्वाधिक सार्वजनिक आणि घरगुती श्रींचे आगमन होणार आहे. त्याखालोखाल कल्याण-डोंबिवली येतो. उल्हासनगरात सार्वजनिक 282 तर घरगुती 42 हजार 581 बाप्पांचे आगमन होणार आहे. रविवारी 12 सप्टेंबरला 15 हजार 717 गौराई मातेचे आगमन होणार आहे.यामध्ये सर्वाधिक उल्हासनगर परिमंडळामध्ये 8 हजार 56, त्याखालोखाल कल्याण- 3 हजार 364,वागळे इस्टेट - 1 हजार 912, ठाणे शहर- 1 हजार 825 आणि भिवंडीत 560 गौराई मातांचा समावेश आहे.

## कोपर'खड्डा'!

झाल्याने एकीकडे डोंबिवलीकर खुश झाले असताना दुसरीकडे दोन दिवसातच पुलावर खड्डे पडल्याने पालिका प्रशासनाच्या कामावर नाराजी व्यक्त होत आहे. आमदार राजू पाटील, जिल्हाध्यक्ष प्रकाश भोईर, शहरअध्यक्ष मनोज घरत यांसह संदीप ( राजू ) पाटील, विद्यार्थी सेना शहर अध्यक्ष मिलिंद म्हात्रे, उपशहर अध्यक्ष दिप्तेश नाईक, प्रीतेश म्हामुणकर, मनविसे उपशहर अध्यक्ष परेश भोईर आदि यावेळी उपस्थित होते.

दरम्यान पालिकेचे कार्यकारी अभियंता तरून जुनेजा हेही पाहणीच्या वेळी आल्याने आमदार पाटील यांनी त्यांना पालिकेच्या कामकाजाबाबत चांगलेच सुनावले. यावेळी आमदार पाटील म्हणाले, उद्घाटनानंतर 48 तास होत नाही तोच खड्डा पडल्याने येथील नागरिकांनी तसेच वाहनचालकांनी उघडपणे नाराजी व्यक्त केली आहे. ज्या तत्परतेने नव्या पुलावरील खड्डा बुजविला गेला त्याच तत्परतेने गणेशोत्सव काळात नागरिकांना दिलासा देण्यासाठी शहरातील रस्त्यावरील खड्डे बुजवावेत अशी मागणीही पाटील यांनी केली आहे. कोपर पुलावर पडलेल्या खड्ड्याची मनसे आमदार पाटील यांनी पाहणी केली यानंतर त्यांनी प्रशासनाने गणेशोत्सवापूर्वी कोपर पूल सुरु करून नागरिकांना दिलासा द्यावा हि आपली देखील मागणी होती. मात्र कोपर पुलावर टाकण्यात आलेल्या डांबरीकरणाच्या दर्जाचा या पुलावर 48 तासाच्या आत खड्डा पडल्याने अंदाज येत आहे. प्रशासनाने उघडीप मिळताच आवश्यक



तो डांबराचा थर देणे गरजेचे होते, मात्र तसे न केल्याने हा खड्डा पडल्याचे प्रशासनाचे म्हणणे असून हा खड्डा ज्या तत्परतेने प्रशासनाने बुजवला तीच तत्परता इतर रस्त्यावरील खड्ड्याबाबत देखील दाखवावी अशी अपेक्षा व्यक्त करताना प्रशासनाने करोना काळात देखील रस्त्यावरील खड्डे बुजविण्यासाठी ठेवलेल्या 17 कोटीच्या निधीतून इतर रस्त्यावरील खड्डे बुजवून नागरिकांना गणेशोत्सव काळात दिलासा द्यावा अशी मागणी केली आहे.

## राज्याकडून कर्ज घेऊनच ठाण्यात अंतर्गत मेट्रो

महामेट्रो कंपनीकडून या संपूर्ण प्रकल्पाचा डीपीआर तयार करण्यात आला होता. मात्र अंतर्गत मेट्रो हा अधिक खर्चिक असल्याचे सांगत केंद्राने अंतर्गत मेट्रो ऐवजी एलआरटी प्रकल्प राबवण्याच्या सूचना ठाणे महापालिकेला केल्या होत्या. अंतर्गत मेट्रो हा 13 हजार कोटींचा होता तर एलआरटी प्रकल्पाची किंमत ही सात हजार 165 कोटींच्या घरात होती. त्यामुळे एलआरटीमुळे सुमारे 5 हजार कोटींची बचत होणार होती. तसा प्रस्तावही पालिकेने मंजुरीसाठी राज्य शासनाकडे पाठवला होता. मात्र भविष्यातील प्रवासी संख्या लक्षात घेता एलआरटी प्रकल्प व्यवहार्य नसल्याचे मत मत केंद्राने नोंदवल्याने आता केंद्राच्या सूचनेनंतर पुन्हा अंतर्गत मेट्रोचा प्रस्ताव तयार करून तो बुधवारी झालेल्या पालिकेच्या सर्वसाधारण सभेत मांडण्यात आल्यानंतर या प्रस्तावाला मंजुरी देण्यात आली आहे. या प्रकल्पाचा खर्च तीन हजार कोटींनी कमी होणार असल्याचा दावा पालिकेने केला आहे.

अंतर्गत मेट्रो प्रकल्प उभारणीच्या खर्चासाठी केंद्र आणि राज्य शासनाचे प्रत्येकी 16.65 टक्के आर्थिक सहभाग असणार आहे, परंतु राज्य शासनाचे समभाग (ठाणे महापालिकेचे सहाय्य) असा उल्लेख प्रस्तावात करण्यात आला असून याबाबत स्पष्टीकरण देण्याची मागणी राष्ट्रवादीचे ज्येष्ठ नगरसेवक नजीब मुल्ला यांनी केली. त्यावर स्पष्टीकरण देताना राज्य आणि केंद्र शासनाकडून अर्थसाहाय्य मिळणार असले तरी ते कर्ज स्वरुपात पालिकेला फेडावे लागणार आहे. तसेच उर्वरित खर्च बहुपक्षीय किंवा द्विपक्षीय संस्थांकडून अल्प व्याज दराने कर्ज घेऊन आणि महापालिकेच्या अर्थसाहाय्यातून केले जाणार आहे, अशी माहिती पालिकेचे प्रकल्प अधिकारी प्रवीण पापळकर यांनी सभेत दिली.

## ठाण्यातील या गणेश भक्ताच्या घरात आहेत हजाराहून अधिक मूर्ती

हीच ओळख बनली आहे. कलेचे भोक्ते असलेल्या दिलीप यांनी जेजे कला महाविद्यालयातून कमर्शियल आर्ट्सचे शिक्षण घेतले असून पूर्णवेळ कलाक्षेत्राशी निगडीत व्यवसायात आहेत. 20 ग्रॅम वजनाच्या मूर्तीपासून ते 300 किलोपर्यंत आणि अर्धा इंचापासून ते 4 फुटी गणेशमूर्तीचा संग्रह त्यांनी केला आहे. यासाठी त्यांनी घराच्या पहिल्या मजल्यावरील दोन खोल्यामध्ये व्यवस्था केली असून येथील वैशिष्ट्यपूर्ण रचनेत कृषीगणेशा ते विश्वविनायकाच्या शेकडो मूर्ती विराजमान आहेत. यात लक्ष वेधून घेणारी स्त्रीरुपी गणेश मूर्ती मनमोहक रुपात आहे. त्यामागची मोठी कहाणी देखील असल्याचे ते सांगतात. याच बरोबरच अखंड एका लाकडापासून एक गणेश मूर्ती आहे आणि विशेष म्हणजे या मूर्तीच्या मागच्या बाजूस नरसिंहाची कलालकृती आहे. याचबरोबर यात माती, शाडू, लाकूड, सोने-चांदी, पंचधातू, तांबे, पितळ, शंख-शिंपले, नारळाची करवंटी, फायबर, सिरॅमिक टेराकोटा, चायना, मार्बल, मशरुम, दगड, काच अशा विविध प्रकारातील गणेश आहेत. आरामात पहुडलेले गणराय, क्रिकेट खेळणारे विविध पोझमधील बाप्पा, सभागायन करताना,खुर्चीवर पुस्तक वाचताना,बुद्धिबळ खेळताना, व्यायाम करताना, मूषकराजांच्या शाळेत शिकवताना, आदिवासी वेशात, बालरुपात, पाळण्यात सृष्टी गणेश ते विश्वविनायक अशा अनेक रूपात लोभस गणेशाच्या मूर्ती मन मोहून घेतात. त्यांच्या या संग्रहालयात जपान, इंडोनेशियासह कंबोडिया आदी देशातील आणि भारतभरातील मुर्त्यांचा समावेश आहे.तर,वैती यांनी गणेशमूर्तीच्या संकलन करीत असताना कॅनव्हॉसवर चितारलेल्या पुरुष गणपतीचे चित्र विलक्षण असून आजवर त्यांनी साकारलेल्या गणेशाच्या तब्बल हजारो प्रतिमाचा खजिना त्यांनी जीवापाड जपला आहे.

# राष्ट्रवादी काँग्रेसच्या पदाधिकाऱ्यांचा भाजपात प्रवेश



**उल्हासनगर:** राष्ट्रवादी काँग्रेसचे उल्हासनगर महासचिव असलेले अमित वाधवा, भारिप बहुजन महासंघाचे पदाधिकारी मनिष हिंगोराणी यांच्यासह शेकडो कार्यकर्त्यांनी उल्हासनगर महापालिकेच्या निवडणुकीच्या तोंडावर आमदार रविंद्र चव्हाण यांच्या उपस्थित प्रवेश केला.

यावेळी आमदार रविंद्र चव्हाण यांनी बेळगांव महानगरपालिकेत आलेल्या भाजपच्या बहुमताचा आवर्जून उल्लेख केला. ते पुढे म्हणाले की देशात सर्वाधिक खासदार हे भाजपचे आहेत, त्याच प्रमाणे मुख्यमंत्री, आमदार, नगरसेवक, महापौर, जिल्हा परिषद सदस्य हे देखिल सर्वाधिक भाजपचे असल्याचे सांगितले. येत्या उल्हासनगर महापालिका निवडणुकीत पुन्हा एकदा भाजप एक हाती सत्ता मिळविणार असल्याकडे समर्थ वाटचाल करीत असल्याचा दावा चव्हाण यांनी केला आहे.

यावेळी अमित वाधवा, मनिष हिंगोराणी, दिनेश पंजाबी, निकी रात्का, आनंद मिश्रा, विष्णू चुग, संजय दर्डा, मुकेश छाबडीया, अश्विन बजाज, पवन गुप्ता, सचिन अहिर आदींनी शेकडो कार्यकर्त्यांसह प्रवेश केला. यावेळी आमदार रविंद्र चव्हाण, कुमार आयलानी, जिल्हाध्यक्ष जमनादास पुरस्वानी, स्थायी समिती सभापती टोनी सिरवानी, विरोधी पक्षनेता किशोर वनवारी, नगरसेवक महेश सुखरामानी, प्रदीप रामचंदानी, राजू जग्यासी, शेरी लुंड, राम पारवानी, अजितसिंग लबाना, मनू रामचंदानी आदी पदाधिकारी उपस्थित होते.

# पडलेल्या घरांच्या दुरुस्तीसाठी शिवसेनेकडून आर्थिक मदत



**भिवंडी:** भिवंडी तालुक्यातील मौजे जुनांदुर्खी गावात नैसर्गिक वादळामुळे भोईरपाडा येथील एकनाथ ठाकरे, सदानंद ठाकरे, संतोष ठाकरे यांच्या घराच्या भिंती व कौले कोसळली होती. या घटनेची माहिती मिळताच आपद्ग्रस्त कुटुंबियांना शिवसेनेकडून मदत देण्यात आली.

गेल्या काही दिवसांपासून पावसाचा सामना शेतकरीवर्ग करीत असतानाच वादळवाऱ्याने ग्रामीण भागातील गोरगरीब लोकांची कमकुवत झालेली घरांची पडझड होऊ लागली आहे. या घटनेची माहिती शिवसेनेचे उपजिल्हा प्रमुख तथा भिवंडीचे नगरसेवक डॉ. देवानंद थळे यांना मिळताच त्यांनी जुनांदुर्खी गावातील आपद्ग्रस्त ठाकरे परिवाराची भेट घेत 25 हजार रुपयांची मदत त्यांना दिली.

भिवंडी पंचायत समिती सदस्य अंकुश पाटील व समाजकल्याण समिती जिल्हा परिषद ठाणे सभापती प्रकाश तेलिवरे यांच्यामार्फत 11 हजार रुपयांची मदत करण्यात आली. यावेळी शिवसेना उपजिल्हा प्रमुख डॉ देवानंद थळे, समाजकल्याण समिती जिल्हा परिषद ठाणे सभापती प्रकाश तेलिवरे, शिवसेना उप तालुकाप्रमुख श्रीधर खारीक, कांबे जिल्हा परिषद गटाचे संपर्क सचिव राजेंद्र पाटील , पंचायत समिती सदस्य अंकुश पाटील, माजी पंचायत समिती सदस्य बबन पाटील, तालुका सचिव राजेंद्र काबाडी, जय भगत, दिपक पाटील, ग्रामपंचायत सदस्य दत्ता शिकारी, शिवसेना विभागप्रमुख चंद्रकांत पाटील, हालुराम पाटील, शिवसेना शाखाप्रमुख संजय वारघडे, शिवसेना शाखाप्रमुख योगेन डावरे, माजी उपसरपंच सोमनाथ पाटील. शिवसेना उपविभाग प्रमुख नितीन नांदूरकर, शिवसेना शाखा प्रमुख के. के. पाटील, उपसरपंच कांबे रमेश पाटील, उपशाखा प्रमुख राजेश पाटील, गणेश शिकारी, युवा सेनेचे अविनाश खारीक, रोशन भोई, अमित घुडे आणि असंख्य शिवसैनिक उपस्थित होते.

जुनांदुर्खी गावातील भोईर पाडा येथील ठाकरे परिवाराला मदत मिळावी, यासाठी शिवसेना शाखाप्रमुख कशिवली मनोज पाटील आणि नरेन गोराडकर शिवसेना समाजसेवक यांनी विशेष मेहनत घेतली. त्याबद्दल ठाकरे परिवाराने त्यांचे विशेष आभार व्यक्त केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राजेंद्र पाटील यांनी केले तर आभार प्रदर्शन दत्ता शिकारी यांनी केले.





**आमदार संजय केळकर व आमदार निरंजन डावखरे यांच्या नेतृत्वाखाली भाजपा घोडबंदर मंडलाच्या वतीने खड्डे आंदोलन करण्यात आले. ओवळा, घोडबंदर रोड. भाजपा घोडबंदर मंडल चे अध्यक्ष राम ठाकूर, निलेश पाटील व कार्यकर्ते या आंदोलनात सहभागी झाले होते.**

## भाजप स्लम सेलच्यावतीने 'माझे घर, माझा गणपती' स्पर्धा

**ठाणे:** पर्यावरणभिमुख गणेशोत्सव साजरा करण्याची संकल्पना जनमानसात रुजवण्यासाठी भारतीय जनता पार्टी ठाणे जिल्हाध्यक्ष आ.निरंजन डावखरे व आमदार संजय केळकर यांच्या मार्गदर्शनाखाली भाजप स्लम सेलचे ठाणे जिल्हा अध्यक्ष कृष्णा भुजबळ यांनी माझा प्रभाग माझा परीवार या मोहिमेंतर्गत "माझे घर माझा गणपती" या संकल्पनेतून घरगुती गणेशदर्शन स्पर्धा 2021 आयोजित केली आहे.

या स्पर्धेत विजेते ठरणाऱ्या गणेश भक्तांना हजारो रुपयांचे पारीतोषीक देऊन गौरवण्यात येणार आहे. स्पर्धेतील विजेत्यांसाठी प्रथम पारितोषिक 5,555 रुपयांचे द्वितीय पारितोषिक 3,333 रुपयांचे तर तृतीय पारितोषिक 2 हजार 222 रुपयांचे आहे. नागरिकांनी या स्पर्धेत उत्स्फूर्तपणे सहभागी होऊन आपापल्या गणपती सजावट व आरास यासाठी केलेल्या तयारीची विस्तृत माहिती शुक्रवारपासून घरी येणाऱ्या परिक्षक मंडळीना द्यावी, असे आवाहन कृष्णा भुजबळ यांनी केले आहे.

## शिक्षक दिनानिमित्त शिक्षकांचा डिजिटल कार्यशाळेतून योगिक व्यायाम

**डोंबिवली :** रविवार 5 सप्टेंबर 2021 रोजी शिक्षक दिनाचे औचित्य साधून रेल चाईल्ड संस्था संचालित महात्मा गांधी विद्यामंदिर, डोंबिवली (प.) आणि योगश्रुत द वेलनेस कल्चर संयुक्त विद्यमाने, खास महाराष्ट्रातील शिक्षक बंधू व भगिनींसाठी राज्यस्तरीय डिजिटल कार्यशाळा हा उपक्रम झाला.

महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यांतील सुमारे 500 शिक्षकांनी ऑनलाईन सहभाग घेतला. या वेबिनारच्या माध्यमातून ज्येष्ठ योग व आहार तज्ज्ञ श्रुती शशांक वैद्य यांनी मोबिलिटी, स्ट्रेचिंग, स्ट्रेंथिंग या पद्धतीने सर्व शिक्षकांकडून व्यायाम करुन घेतले. तसेच प्राणायाम व ध्यानधारणा यातून मन व शरीरावरील ताण दूर केला.

# एका माथेफिरुमुळे इतर फेरीवाल्यांना शिक्षा का ?

ज्या फेरीवाल्याकडून ठाणे महानगरपालिकेच्या सहायक आयुक्त कल्पिता पिंपळे यांच्यावर हल्ला झाला, त्याचे कधीच समर्थन होऊ शकत नाही. पण एकाची शिक्षा इतरांना देताना प्रथमच आपल्या देशात पाहत आहे. ज्या देशात अनेक गंभीर दोषींना शिक्षा न देता सही सलामत कायद्यातून अनेकवेळा सुटलेले बघितले. कोणी एकाने गैरकृत्य केले, त्यामुळे फेरीवाल्यांविरुद्ध कारवाई केली जात आहे. महापालिका अतिक्रण विभाग फक्त फेरीवालयांवर कारवाई करण्यासाठीच आहे का? अनधिकृत बांधकामे पाडण्याकरिता कुठला विभाग काम करतो. एवढ्या अनधिकृत इमारती शहरात कशा उभ्या राहिल्या. तसेच किती अनधिकृत होर्डिंग्ज शहरात उभे आहेत, ज्यामुळे शहराच विद्रूपीकरण होत आहे.

तलावांचे शहर म्हणून लौकिक असणारे शहर कधी जाहिरात फळकांचे झाले हे शहरवासियांना समजले नाही. जे लोक गरिबीमुळे वाममार्गाला न जाता मेहनतीने कुटुंबाचा उदरनिर्वाह करतात, ते महापालिकेकडे अधिकृतपणे रोज 50 रुपये भरणा करतात. स्थानिक गुंडांचा हप्ता देतात. अतिक्रणविरोधी अधिकाऱ्यांपासून गाडी उचलणाऱ्या पोरांपर्यंत काहीना काही चिरीमिरी देत राहतात. एवढं करून दोन पैसे कमावतो, घरखर्च चालवतो. गेली दोन वर्षे कोरोना संकटात अनेक नोकरदार युवक नोकरी गेल्यामुळे फेरीवाले म्हणून धंदे करीत आहेत. अशा लोकांचं काय होणार हे पालिकेने पाहिलं पाहिजे, नाहीतर हे लोक गरिबीमुळे अनैतिक किंवा गुन्हेगारीच्या मार्गांनी जातील. शहरात चोऱ्या-दरोडे वाढतील.

अधिकाऱ्यावर हल्ला झाला म्हणून कारवाई करत असाल तर ते अयोग्य आहे. बदला हा खुनशी माणसाचा स्वभाव असतो. लोकशाहीत अशोभनीय कृत्याला कुठेही थारा नाही.

**- योगेश भोईर**

**PUBLIC NOTICE**

IT IS BEING MADE KNOW TO the Public at Large that my client Mr Jayant Jijabhai Thorat of Thane, as intended to purchase and acquire on ownership basis landed property more particularly described in the Schedule hereunder written, from its Owner namely Mr. Maki Homi Chibbar, for valuable consideration.

ANY PERSON, Body, Institution, etc. having any claim and/or objection in respect of, against or relating to, or touching upon the said property, by way of sale, lease, lien, mortgage, charge, gift, easement, maintenance or otherwise, SHALL communicate the same to the undersigned at his address within 14 days from the publication of this notice, with the documentary evidence in support thereof, FAILING WHICH my client shall complete the transaction deeming the said properties to be FREE FROM EMCUMBRANCES, claims, etc. of whatsoever nature. PLEASE take note of the same.

**SCHEDULE**

All that piece or parcel of agricultural land or ground bearing survey No.**180, Hissa No.5, admeasuring 0H-36R-4P, equivalent to 3242 Sq.Meters equivalent to 34900 Sq.ft. assessed at Rs.2.69,** lying, being and situate at **Village Kolshet, Talathi Saja Kolshet, Tal. & Dist. Thane,** within the limits of Thane Municipal Corporation and within the Registration District and SubRegistration District of Thane.

**Date :** 10/09/2021.

**Add :** 108, Bhiwandiwala Terrace, Above Axis Bank, Court Naka, Thane (W) 400601

Sd/-
**Adv. Vijay P. Kadam**

**जाहीर नोटीस**

या नोटीसीद्वारे तमाम जनतेस कळविण्यात येते की, **मौजे, खारटन, ठाणे शहर, ठाणे (प.) येथील जय हिंद को.ऑप. हौसिग सोसायटी लि. बी. नं. आर १, फ्लॅट नं.३०२. (क्षेत्रफळ २७० कारपेट) ३ रा मजला, सी.टी. सर्व्हे नं. १३ प व १४ प,** टिका नं.२, ठाणे महानगरपालीकेच्या कार्यक्षेत्रात व सब रजिस्ट्रार ठाणे यांच्या अखत्यारित अशी मालमत्ता ही श्री. ज्ञानदेव गणपत आमराळे यांच्या मालकीचा आहे. सदर फ्लॅट नं.३०२ हा त्यांच्या कुटुंबियांच्या ताबे कब्जा वहिवाटीत आहे.

तरी श्री. ज्ञानदेव गणपत आमराळे यांचे दि. १७/०९/२०१२ रोजी ठाणे येथे दुःखद निधन झाले असल्या कारणाने, त्यांच्या धर्म पत्नी श्रीमती. चंद्रभागा ज्ञानदेव आमराळे यांच्या नावे जय हिंद को.ऑप. हौसिग सोसायटी लि. बी. नं. आर १, फ्लॅट नं.३०२, ३ रा मजला, सी.टी. सर्व्हे नं. १३ प व १४ प., टिका नं.२. यांच्या दप्तरी वारस हक्काने पत्नी म्हणुन फ्लॅट मालक अशी नोंद करावयाची आहे.

तरी वरील फ्लॅटच्या मालकी हक्काच्या संदर्भातील नामांतराबाबत कोणाचाही मालकी, कब्जा, वहीवाट, विक्री करार, तारण, गहाण दान, बक्षिस, जुना व नविन भाडे करार, भाडेपट्टा, पोटगी, विश्वस्त, अवाढ, मृत्युपत्र वगैरे कोणत्याही प्रकारचे हक्क हितसंबंध असल्यास त्यांनी त्यासंबंधी पुराव्याच्या कागदपत्रासहीत सदरची नोटीस जाहीर झाल्यापासुन ०७ दिवसांच्या आत आमच्या कार्यालयात आमच्याकडे तशी लेखी स्वरुपात हरकत दाखल करावी. जर मुदतीत तशी कोणाकडूनही कोणत्याही प्रकारची हरकत आली नाही किंवा हक्क अथवा हरकत असल्यास व मुदतीत तशी हरकत न घेतल्यास ते त्यांनी सोडुन दिले आहेत असे समजुन वरील वर्णन केलेल्या मिळकतीचे आमचे अशील श्रीमती. चंद्रभागा ज्ञानदेव आमराळे याच्या नावाची नोंद सरकार दप्तरी तसेच सदर सोसायटी दप्तरी करून घेतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही हरकतीस आमचे अशील जबाबदार राहणार नाहीत, याची कृपया नोंद घ्यावी.

**दिनांक :-** ०९/०९/२०२१

**पत्ता :** अवधूत दर्शन को.ऑप. हौ.सो.लि. तळ मजला, फ्लॅट नं.१, संत तुकाराम रोड, कोपरी कॉलनी, ठाणे (पुर्व.) ४००६०३

सही/-
**ॲड. सुभाष चं. गाडेकर**

'ठाणेवैभव' हे दैनिक मालक-मुद्रक-प्रकाशक मिलिन्द बल्लाळ यांनी मिड-डे इन्फोमिडिया लि., R/847/3, टी.टी.सी. इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी रबाळे, नवी मुंबई-४००७०१. महाराष्ट्र येथे छापून दामले अपार्टमेंट, टेंभीनाका, ठाणे (प) महाराष्ट्र -४००६०१ येथे प्रकाशित केले.
दूरध्वनी नं. २५३४१५२६,२५३४८५९४ Email : thanevaibhav1975@gmail.com

# मीरा-भाईंदर वैभव

ठाणेवैभव | ५ | ठाणे, शुक्रवार १० सप्टेंबर २०२१ | संपादक - मिलिन्द बल्लाळ | निवासी संपादक - राजेंद्र कांबळे | www.thanevaibhav.in


आम्हा घरी धन । शब्दांचीच रत्ने। शब्दांचीच शस्त्रे । यत्ने करू।।

## बाप्पा, एवढे कर...

सलग दुसऱ्या वर्षी गणेशभक्तांच्या आनंदावर विरजण पडले आहे. गेल्या वर्षीच्या तुलनेत निर्बंध शिथील असले तरी तिसऱ्या लाटेची टांगती तलवार सर्वांच्याच डोक्यावर आहे. त्यामुळे एकीकडे आपल्या लाडक्या दैवतावरची प्रचंड श्रध्दा तर दुसरीकडे कोरोनाचे सावट झेलीत यंदाचा गणेशोत्सव साजरा होत आहे. मनमोकळा जल्लोष हा या सणाचा खरें तर आत्मा. तोच हरवल्याचा सार्वत्रिक अनुभव समाज घेत आहे.

साथ अजूनही पूर्ण आटोक्यात नाही आणि ती केव्हा नियंत्रणात येईल हेही सांगितले जात नाही. अशा संभ्रमावस्थेत नागरीक परिस्थिशी समझौता करून गणपतीची आराधना करणार आहेत. अतिशय भक्तीभावाने, एकमुखाने एकच साकडे बाप्पाला घातले जाईल आणि ते म्हणजे कोरोनाच्या पाशातून जगाची पूर्ण मुक्तता करण्याचे. नवसाला पावणाऱ्या अनेक गणपतींसमोर ही याचना झाली तर नवल नाही.

बुध्दीची देवता असा गणपतीचा लौकिक. या देवाला देशभरातील आणि खास करून महाराष्ट्रायील जनता एकच कळकळीची प्रार्थना करीत आहे आणि ती म्हणजे शाळा–महाविद्यालये सुरू करण्याची. कोणीतरी योग्यच म्हटले आहे की सरकार मॉल आणि मद्यालये सुरू करीत असेल तर महाविद्यालय आणि विद्यालये का नाही? गणपतीच्या मनातही विद्यार्थी आणि पालक यांच्याबद्दल कळवळा असेल तर त्याने शिक्षणमंत्री, मुख्यमंत्री आणि शिक्षण विभागाला सुबुध्दी द्यावी.


गेल्या काही दिवसांपासून महाराष्ट्रातील नेत्यांचे वर्तन पाहून जनता दु:खी आणि अचंबित झाली आहे. या समस्त वाचाळ नेत्यांच्या जिभेला वळण लावण्याचे कामही बाप्पाने करावे, अशी प्रार्थना आहे. एकीकडे सकल राष्ट्रीय उत्पन्न वाढत आहे आणि जीएसटीचा भरणाही वधारला आहे. तरी जनतेला महागाई, बेरोजगारी आदी समस्यांचा मुकाबला करावा लागत आहे. या तिढ्यातून जनतेची मुक्तता व्हावी, अशीही एक प्रार्थना आहे.

कोरोनामुळे जीवन–मरणाचे मोल स्पष्टपणे कळून चुकले असताना काही मंडळी मात्र अनैतिकतेची, हिंसाचाराची आणि गैरवर्तनाची कास सोडायला तयार नाही. आरोग्य सेवेतील अनैतिक प्रकार असोत की बेकायदा बांधकामे करण्याचा प्रकार, अशी कृत्ये होणे म्हणजे कोरोनाची समाजाला आता भीती राहिली नाही असे सूचित होत आहे.

कोरोनाचा मुकाबला करताकरता प्रगतीची कास धरण्यासाठी बाप्पाने सर्वांना सुबुध्दी द्यावी. आनंद, उत्साह आणि उत्कर्ष सर्वांना लाभो हीच गणपतीचरणी प्रार्थना. पूर्वपरिस्थितीचे पुनर्गामन व्हावे हीच इच्छा.

## बीएसयूपी योजनेतील इमारतीमध्ये सुविधांचा आभाव, नागरीकांचे हाल

**भाईंदर: मीरा-भाईंदर महापालिकेच्या बीएसयूपी योजनेतील रहिवाशांचे स्थलांतर केलेल्या इमारतीमध्ये मूलभूत सुविधा उपलब्ध होत नसल्यामुळे तेथील रहिवाशांची गैरसोय होत आहे. या रहिवाशांच्या सुविधाकडे लोकप्रतिनिधी व पालिका प्रशासन दुर्लक्ष करत आहे असा तेथील रहिवाशांनी आरोप केला आहे.**



मीरा-भाईंदर महापालिका हद्दीतील पांडुरंगवाडी येथे एमएमआरडीए इमारतीमध्ये काशिमिरा, जनतानगर येथील बीएसयुपी योजनेच्या लाभार्थ्यांना तात्पुरत्या स्वरुपात राहण्यासाठी घरे देण्यात आली आहेत. या परिसरात लोढा, मन ऑपस, एस.के. हाईट्स येथे इमारती असून या इमारतीमधील विद्युत पुरवठा, लिफ्ट, साफसफाई योग्य प्रकारे होत नाही. येथील लिफ्ट बहुतेक वेळा बंदच असते, त्यामुळे येथील रहिवाशांना फार त्रास सहन करावा लागत आहे. यामध्ये वृद्ध नागरिक, लहान मुले व रुग्णांची गैरसोय होत आहे. त्याबाबत महापालिकेला व लोकप्रतिनिधीना अनेकवेळा सांगूनही येथील जनतेच्या समस्या सोडवल्या जात नाहीत. येथील इमारतीची देखभाल दुरुस्ती करणारा ठेकेदार व त्यांचे कर्मचारी रहिवाशांना योग्य माहिती देत नाहीत त्यामुळे त्या ठेकेदाराला काळ्या यादीत टाकून त्याच्यावर दंडात्मक कारवाई करण्यात यावी. पालिका अधिकारी व लोकप्रतिनिधी यांनी या रहिवाशांच्या समस्येकडे दुर्लक्ष न करता त्या समस्या दूर कराव्यात. लोढा या इमारतीतमध्ये गेल्या दीड ते दोन महिन्यापासून लिफ्ट बंद आहे. ही इमारत 18 मजल्याची असून या इमारतीत वृद्ध नागरिक , महिला यांना 18 मजले चढत जाणे त्रासदायक ठरत आहे. अनेक वृद्ध रहिवाशी हे आजारी असतात त्यांना 18 मजले चढणे त्यांच्या आरोग्याच्या दृष्टीने त्रासदायक ठरत आहे.


या इमारतीची लिफ्ट लवकरात लवकर दुरुस्त करण्यात येऊन विद्युत पुरवठाही सुरळीत ठेवण्याची मागणी करण्यात येत आहे. या इमारतीतमध्ये सात लिफ्ट असताना नेहमीच लिफ्ट बंद असते. एकही लिफ्ट चालू नसते. त्यामुळे पालिका प्रशासन व लोकप्रतिनिधी विरोधात नाराजी व्यक्त केली जात आहे. लोकप्रतिनिधी हे फक्त मतदान मागण्यासाठी येतात आता रहिवाशांच्या समस्यांकडे दुर्लक्ष करत आहेत. येथील इमारतीची देखभाल दुरुस्ती सार्वजनिक बांधकाम विभागाकडे येत असून महापालिकेचे अधिकारीही येथील नागरिकांच्या सोयीसुविधाकडे लक्ष देत नसून महापालिका अधिकारी व ठेकेदारांच्या साटेलोट्यामुळे गरीब जनतेचे हाल होत आहे.

यापेक्षा पूर्वी आम्ही राहत होतो ती झोपडपट्टी तरी बरी होती असे रहिवाशी सांगत आहेत. त्यामुळे महापालिका आयुक्त दिलीप ढोले व सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता दीपक खांबीत यांनी येथे पाहणी करून येथील नागरिकांच्या समस्या तातडीने सोडवाव्यात, अशी रहिवाशांची मागणी असून आता महापालिका आयुक्त व सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता येथील समस्या कधी दूर करतील याकडे येथील रहिवाशांचे लक्ष लागून राहिले आहे.

या इमारतीची लिफ्ट खराब झाली असून तिचे साहित्य मिळत नसून त्या पार्टसची कंपनीला मागणी केली आहे. ते पार्टस मिळताच लिफ्ट दुरुस्त केली जाईल व तेथील रहिवाशांच्या समस्या सोडवल्या जातील असे प्रभारी उपअभियंता यतीन जाधव यांनी सांगितले आहे.

## कोरोनातही गणेशोत्सवाचा उत्साह पोहोचला शिगेला

### गतवर्षीपेक्षा यंदा दुप्पट मंडळे



**भाईंदर: कोरोना आजाराचा प्रादुर्भाव वाढू नये म्हणून राज्य शासनाकडून गणेशोत्सव साजरा करण्यावर कठोर निर्बंध लागु केले आहेत. मात्र तरीही यंदा मीरा-भाईंदर शहरात 103 गणेशोत्सव मंडळांनी निर्धार केला आहे. हाच आकडा गेल्यावर्षी 60 एवढा होता.**

मीरा-भाईंदर पालिका हद्दीत 302 पेक्षा अधिक सार्वजनिक गणेशोत्सव मंडळे आहेत. या मंडळांना पालिकेकडून मंडप उभारणीसाठी परवानगी दिली जाते. मंडळाच्या कार्यकर्त्यांना एकाच ठिकाणी परवानगी मिळावी यासाठी पालिकेने प्रभाग क्षेत्र कार्यालयांतर्गत येणाऱ्या स्थानिक पोलीस ठाण्यामध्ये एक खिडकी योजनेतून या परवानग्या देण्याची व्यवस्था केली आहे. मंडप उभारणीसाठी पालिकेकडून चौरस फुटाप्रमाणे मंडळाकडून दर आकारला जातो. याशिवाय अग्निशमन विभागाची परवानगी घेताना शुल्क आकारणी केली जाते.मात्र करोना आजाराच्या पार्श्वभूमीवर यंदा हे शुल्क माफ करण्याचा निर्णय नुकत्याच पार पडलेल्या सर्वसाधारण सभेत घेण्यात आला आहे. मात्र अद्यापही कोरोना आजाराच्या संभाव्य तिसऱ्या लाटेचा फटका शहराला बसू नये म्हणून प्रशासनाकडून खबरदारीची पावले उचलण्यात येत आहेत.

यंदा 103 सार्वजनिक गणेश मंडळांनी मंडप परवानगी घेतली आहे. धक्कादायक बाब म्हणजे गेल्यावर्षी केवळ हा आकडा 60 च्या आत होता. त्यामुळे यंदा गणेश उत्सव साजरा करणाऱ्या गणेश मंडळांचा वाढता उत्साह धोक्याची घंटा वाजवू शकतो, अशी भिती प्रशासनाच्या मनात निर्माण झाली आहे.

## उत्तन भागातील दोन रेती माफियांना अटक

भाईंदर : भाईंदरच्या उत्तन भागात रेती चोरी करणाऱ्या दोन रेती माफियांना उत्तन सागरी पोलिसांनी अटक केली आहे.

गेल्या अनेक वर्षांपासून उत्तन समुद्र किनारा परिसरात काही रेती माफिया सक्रिय असून पाली बीच, वेलंकनी चर्च तसेच पाली पेट्रोलपंप जेट्टीजवळ बेकायदा रेती चोरून तस्करी आणि विक्री केली जात होती.

या भागात जावेद अबरार खानसुद्धा रेती चोरी करत होता. काही राजकीय पुढारी, महसूल आणि पोलीस खात्यातील वरदहस्त यामुळे त्याला अटक होत नसल्याने त्याचा दबदबा वाढत होता. गेले काही दिवस रेती चोरी विरुद्ध काही जागरूक नागरिक सातत्याने पोलीस आयुक्तांकडे तक्रारी करत होते. रेती माफिया जावेद अबरार खान आणि त्याचा एक साथीदार मुसाईद अबरार खान रेती चोरी असताना उत्तम सागरी पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक प्रशांत लांगी आणि त्यांच्या पथकाने रंगेहात पकडून त्यांच्यावर गुन्हा दाखल करून दोघांना अटक केली आहे.

## काशिमीऱ्यात घरफोडी करणाऱ्या तिघांना अटक

भाईंदर : मीरारोडच्या काशिमीरा परिसरात चोरी, घरफोडी करणारे तसेच अवैधरित्या शस्त्र बाळगणाऱ्या तिघांना काशिमीरा पोलिसांनी अटक केली आहे. या आरोपींनी सात गुन्ह्यांची कबुली दिली असून पोलिसांनी त्यांच्याकडून दोन लाख 45 हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

काशिमीरा पोलीस ठाण्याच्या हद्दीत झालेल्या चोऱ्या, घरफोडी गुन्ह्याचा तपास करताना पोलीस उपआयुक्त अमित काळे, सहाय्यक पोलीस आयुक्त विलास सानप यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलिस निरीक्षक संजय हजारे, पोनि विजय पवार, पोनि जितेंद्र पाटील,सपोनि, महेंद्र भामरे, सपोनि. प्रशांत गांगुर्डे, पोउपनि, जावेद मुल्ला, पो.ना. विश्वनाथ जरग, बाबु पवार, पो. शि. हनुमंत तेरवे,समीर यादव, अनिल नागरे, सुधीर खोत, सनी सुर्यवशी यांनी घटनास्थळावरुन मिळालेल्या तांत्रीक गोष्टींचा अभ्यास करुन तसेच गुप्त बातमीदारांमार्फत मिळालेल्या माहीतीच्या आधारे गुन्ह्यांचा तपास करुन अट्टल गुन्हेगार राधेश्याम जगत नारायण पाल (41), धर्मेंद्र तहसीलदार यादव (30), अजय राममुरत नावीक (35) या तिघांना नालासोपारा येथून अटक केली. गुन्हे प्रकटीकरण शाखेतील अधिकारी व अमंलदार यांनी कौशल्याने तपास करुन काशिमीरा पोलीस ठाण्याचे 6 व विरार पोलीस ठाण्याचा एक असे सात गुन्हे उघडकीस आणले.

## पर्यावरण अहवाल बोगस; कंत्राटदारावर लाखोंची उधळपट्टी

### पर्यावरण अभ्यासकाचा आरोप

भाईंदर: मीरा-भाईंदर महापालिका प्रशासनाने पर्यावरण अहवालासाठी नेमलेल्या ठेकेदाराने लाखो रुपये गट्टम करुन बोगस अहवाल सादर केल्याचा खळबळजनक आरोप पर्यावरण अभ्यासकाने केला आहे.

मीरा-भाईंदर महानगरपालिका प्रशासनाकडून नुकताच पर्यावरण अहवाल प्रकाशित करण्यात आला आहे. मात्र या अहवालात अनेक ठिकाणी मीरा-भाईंदरऐवजी चक्क स्कॉटलँड, युके या ठिकाणांचा उल्लेख करण्यात आला आहे. त्यामुळे इंटरनेटवर उपलब्ध इतर अहवालाचा आधार घेत हा बनावट अहवाल तयार करण्यात आला असून प्रशासनाचे लाखो रुपये वाया गेले असल्याचे आरोप पर्यावरणप्रेमी वर्गाकडून करण्यात येत आहे.

पर्यावरण अहवालाच्या मदतीने शहरातील पर्यावरणाचा समतोल राखणे, कांदळवन क्षेत्र जपणे, जैवविविधता जपणे, सांडपाण्यावर प्रक्रिया करणे आणि घनकचरा व्यवस्थापन करणे अशा महत्वाच्या गोष्टीचा यांमध्ये समावेश आहे. यामुळे भविष्यात घडवून आणल्या जाणाऱ्या विकास कामांचे योग्य व्यवस्थापन करण्यास प्रशासनाला मदत होते. 2020-21 या वर्षाकरिता मीरा भाईंदर शहराचा हा अहवाल तयार करण्याचे काम पालिका प्रशासनाने खाजगी कंत्राटदाराला सोपवले होते. याकरिता साधारण अडीच ते चार लाख रुपयांपर्यंत खर्च निर्धारित करण्यात आला होता. मात्र या वर्षी प्रकशित करण्यात आलेला हा अहवाल सत्य परिस्थितीशी पूर्णतः वेगळा असून बनावट असल्याचे आरोप करण्यात येत आहे.

या संदर्भात महानगरपालिकेचे जनसंपर्क अधिकारी राज कुमार घरत यांना विचारणा केली असता त्यांनी या संदर्भात प्रतिक्रिया देण्यास नकार दिला आहे.

दरम्यान शहराचा पर्यावरण अहवाल तयार करण्याचे काम शासनाच्या मुंबई विद्यापीठाद्वारे देखील करण्यात येते. महत्वाची बाब याद्वारे अहवाल तयार करण्याकरिता पालिका प्रशासनाला निविदा प्रक्रिया करणे देखील बंधनकारक नाही आहे. मात्र तरी देखील महानगरपालिका प्रशासनाने या पर्याय वगळून मुदाम खासगी कंत्राटदाराच्या हाती हे काम सोपवले आहे. त्यामुळे या कामात प्रचंड प्रमाणात घोळ करण्यात आला असून पैशाची उधळपट्टी झाली असल्याचे आरोप पर्यावरण अभ्यासक तुषार गायकवाड यांनी केले आहेत.

## थोतांड, एक नाट्य !

**कानोसा — राजेंद्र कांबळे**

वेदर शेड म्हणजे पावसापासून संरक्षण मिळविण्याचे छत्र. त्यामुळे वेदर शेडसाठी मे महिन्यातच परवानगी देण्यात यावी. तत्पुर्वी या मागणीसाठी दाखल अर्ज सरळ निकाली काढण्यात यावेत, अशी तंबीच तात्कालीन आयुक्त डॉ. विजय राठोड यांनी माजी निलंबित नगररचनाकार दिलीप घेवारे यांना दिली होती. परंतु या शहरात 20-20 वर्षापुर्वीच्या इमारतींची दयनीय अवस्था लक्षात घेता शेकडो सोसायटीधारकांनी विना परवाना आपआपल्या सोसायट्यांच्या टेरेसवर वेदर शेडची उभारणी करीत मीरा-भाईंदर महानगरपालिकेला ठेंगा दाखविलेला आहे. महानगरपालिकेचे विद्यमान आयुक्त दिलीप ढोले यांनी या बेकायदा उभारण्यात आलेल्या वेदर शेड प्रकरणी संबंधित सोसायट्यांना नोटीसा बजाविण्याचा सपाटा सुरु केला आहे. तत्पुर्वी अलिकडेच धुवाधार पावसात कोसळलेल्या तीन जुन्या इमारत दुर्घटनेच्या नावाखाली या शहरातील सर्व इमारतींना स्ट्रक्चरल ऑडीट करण्यासंदर्भात नोटीसा बजाविण्यात आलेल्या आहेत. त्यामुळे ऑडीट करणाऱ्या संस्थांनी दिवाळीपुर्वीच फटाके वाजवायला सुरुवात केली आहे. तर वेदर शेड परवानगीसाठी इमारतीचा बांधकाम परवाना, सातबारा उतारा आणि ऑडीट रिपोर्टची मागणी प्रभाग कार्यालयातून होऊ लागली आहे. मीरा-भाईंदर शहरात नगरपरिषदेच्या काळापर्यंत बांधण्यात आलेल्या इमारतींचा बांधकाम परवाना घेण्यात आलेला नाही. त्यामुळे वेदर शेडसाठीचा परवाना अशा इमारतींना मिळण्याची सुतराम शक्यता नाही. इमारत जुनी असल्याने पावसाळ्यात टेरेसवरुन घरात पाणी शिरुन इमारतच कमकुवत होण्याची दाट शक्यता असते. त्यामुळे या सोसायटीधारकांनी आपल्या इमारतींच्या टॅरेसवर लाख लाख रुपये खर्चुन वेदर शेड बांधलेले आहेत. आता या वेदरशेडवर कारवाई होण्याच्या भितीने सोसायट्यातील सभासद गारठले आहेत.

महापालिका प्रशासनाने मानवतावादी दृष्टीकोन ठेऊन वेदर शेड उभारलेल्या सोसायट्यांना जैसे थे स्थितीत वेदर शेडचा परवाना कोणत्याही प्रकारच्या अटीशर्ती न लादता द्यायला हव्या होत्या. यामुळे पालिकेला अतिरीक्त उत्पन्न मिळाले असते आणि महासभेत या विषयावरुन प्रशासनाच्या अब्रुचे धिंडवडेदेखील निघाले नसते. वास्तवित पाहता वेदर शेडला परवानगी देण्याबाबतचा ठराव यापुर्वीच महासभेत मंजूर झालेला आहे. फक्त या ठरावाची अंमलबजावणी करताना अटीशर्तींचा बागुलबुवा उभा करायला नको होता. बागुलबुवाच्या नावाखाली इमारतींच्या टेरेसवर महापालिकेने बुजगावण उभारल्यामुळे सर्वच राजकीय पक्षाचे नगरसेवक एकवटले. त्यामुळे प्रशासनाचं चांगलच हसं झालं.

वेदर शेडचा विषय कमी की काय, प्रशासनाने लोकप्रतिनिधींच्या हाती अनधिकृत बांधकामच आणखी एक कोलित दिल आहे. अनधिकृत झोपड्याविरोधात पावसाळ्यात कारवाई करु नये, असा शासन निर्णय आहे. परंतु प्रसिद्धीच्या लाटेवर स्वार झालेल्या आयुक्त दिलीप ढोले यांनी या शासन निर्णयाला केराच्या टोपलीचा रस्ता दाखविला. तसेच माशाचापाडा नजिकच्या 300 झोपड्या जमिनदोस्त केल्या. ऐन पावसाळ्यात येथील झोपडपट्टीधारक रस्त्यावर आले आहेत. त्यांचा संसार उघड्यावर आला आहे. येथील असंख्य झोपडीधारकांकडे 1995 पुर्वीचे पुरावे आहेत. तर काही झोपड्या आता ऑक्टोपसप्रमाणे वाढल्या आहेत.

सदरहू जागा महानगरपालिकेच्या ताब्यात असून या जागेच्या सातबारा उताऱ्यावर महानगरपालिकेच्या नावाची नोंद झालेली आहे, असे सांगण्यात येत आहे. तसे असेल तर या जागेचा टिडीआर भुमिपूत्र जमिन मालकास दिला गेला आहे की नाही, याचा खुलासा होणे आवश्यक आहे. इतकेच नव्हे तर हा भूखंड मोकळा करुन प्रशासन या जागेवर पंचतारांकीत गार्डन आणि उद्यान कधी उभारणार हेदेखील समजले पाहिजे.

या जागेवर उभारण्यात आलेल्या झोपड्यांना राजाश्रय होता की प्रशासकीय संरक्षण होते, याचे आयुक्त दिलीप ढोले यांनी चिंतन करायला हवेय. केवळ साप साप म्हणून भुई थोपटून महापौर ज्योत्स्ना हसनाळे यांना बदनाम करण्याचा विडा काही युट्युब चॅनलवाल्यांनी उचलला आहे. हसनाळे यांच्या निष्कलंक राजकीय कारकिर्दीला डाग लावण्याचाच हा अश्लाघ्य प्रकार म्हणावा लागेल. पत्रकारीता आज किती खालच्या थराला घसरत चालली आहे, याचे हे मुर्तीमंत उदाहरण आहे. या जागेवर सुरुवातीलाच भुमाफीयांनी वीट रचली होती. तेव्हा प्रभाग अधिकारी काय तंबाखू मळत बसला होता की डान्स बारमध्ये पैसे उधळत होता. या जागेवरील अनधिकृत झोपड्यांविरोधात कारवाई करण्यासाठी माजी आयुक्त बालाजी खतगांवकर यांनी तत्कालीन प्रभाग अधिकारी चंद्रकांत बोरसे यांना जोनवारी 2020 रोजी आदेश दिले होते. परंतु बोरसे एका नाजूक कामासाठी नगरभवनात सातत्याने व्यस्त होते. काशिमिरा येथील आरक्षण क्र. 364 व 365 मधील झोपडपट्ट्यांवर झालेली कारवाई म्हणजे विकासक बिनोय प्रमोद शाह यांना टिडीआर देण्यासाठीच झाल्याचा आरोप आता होऊ लागला आहे. अनधिकृत बांधकाम प्रकरणी बदनाम झालेले प्रभाग अधिकारी स्वप्नील सावंत यांना प्रभारी उप-आयुक्त पद देऊन गौरविण्यात आलेले आहे. तर दुसरीकडे, "नगरसेवकांना मी भीक घालित नाही, ते माझे काहीही वाकडे करु शकत नाही, मी त्यांना बांधिल नाही" अशी मुजोरपणाची दर्पोक्तीची भाषा वापरणाऱ्या प्रभाग अधिकारी हंसराज मेश्राम यांचा महानगरपालिकेच्या वतीने व महापौरांच्या हस्ते गौरव करण्यात यावा, ही ज्येष्ठ नगरसेवक ध्रुवकिशोर पाटील यांची मागणी खऱ्या अर्थाने रास्त आहे. मेश्राम यांची लायकी आणि पात्रता नसताना ढोले यांनी त्यांच्याकडे वन उपअधिक्षक पदासह प्रभाग अधिकारी पदाचा पदभार सोपविलेला आहे. मेश्रामने वन विभागात गवतदेखील खाण्यासाठी कोणाला शिल्लक ठेवलेले नाही. आतातर, प्रभाग अधिकारी पदाचा पदभार म्हणजे लवकरच ध्रुवकिशोर पाटील यांना हंसराज मेश्राम यांचा स्वखर्चाने वसुलीसम्राट हा ताम्रपट देऊन गौरव करावा लागणार आहे. ध्रुवकिशोर पाटील यांनी केलेली टवाळकी पाहता ख्यातनाम लेखक विजय तेंडुलकर लिखीत हे सार कुठून येत ? या पुस्तकाची आठवण येते.

मिरा-भाईंदर शहरात विकासकांनी महानगरपालिकेच्या मोकळ्या भुखंडांचा 64 कोटी रुपयांचा कर थकविला आहे. याउपर आज हेच थकबाकीदार विकासक आयुक्त दिलीप ढोले यांच्या मांडीला मांडी लाऊन आयुक्त दालनात बसत आहेत.

या विकासकांच्या बांधकामांना बांधकाम परवाना मंजूर झालाच पाहिजे. परंतु मोकळ्या जागेचा कर वसुल करण्याच्या नावाखाली ढोले यांनी मिठाच्या गुळण्या करु नयेत. या महानगरपालिकेत भ्रष्टाचाराचा डोंगर उभा राहिला आहे, अस म्हटल जातयं. उद्या या डोंगराचा हिमालयाइतका पर्वत आपल्या कारकिर्दीत उभारला जाऊ नये, हीच ढोले यांच्याकडून माफक अपेक्षा आहे. अन्यथा भाजपचे ज्येष्ठ नगरसेवक ध्रुवकिशोर पाटील यांना याच पर्वतावर आपला सत्कार करण्याचा प्रस्ताव महासभेत मांडावा लागेल.

एकीकडे आमदार गिता जैन यांचे स्वीय सहाय्यक संजय पांगे यांनी एम.एम. आर.डी.ए. झोनमध्ये असलेल्या महानगरपालिकांत आयुक्त म्हणून सनदी अधिकारी असावा, याकरीता आवाज उठविला आहे. या आवाजाची शासनानेदेखील दखल घेतली असल्याची माहिती मिळत आहे. त्यामुळे सनदी अधिकारी नसलेल्या आयुक्त दिलीप ढोले यांनी आपल्या आयुक्त पदाच्या कारकिर्दीत जनमाणसात आपली प्रतिमा उज्वल केली तर आणि तरच येथील जनता आपल्या बदलीच्या विरोधात रस्त्यावर उतरतील अन्यथा आपणास रस्त्यावर आणण्यासाठी संजय पांगे विठ्ठलासारखा विटेवर उभाच आहे. संजय पांगे नावाचे रसायन काही बागुलबुवा करणारे बुजगावणे नाही, याचही भान ढोले यांना ठेवावं लागेल.

## वॉक विद कमिशनर उपक्रमांतर्गत आयुक्तांनी साधला तरुणांशी संवाद



**भाईंदर: वॉक विद कमिशनर या उपक्रमाअंतर्गत आज आयुक्त दिलीप ढोले यांनी शहरातील तरुणांशी संवाद साधला. आज सकाळी आपल्या अधिकारी वर्गासह आयुक्त क्रिकेटच्या मैदानात दाखल झाले.**

आयुक्त आणि अधिकारी मैदानात दाखल झाल्याने क्रिकेट खेळणाऱ्या तरुणांना सुद्धा आश्चर्याचा धक्का बसला. मैदानात जाताच आयुक्तांनी बॅट हातात घेऊन जोरदार फलंदाजीला सुरुवात केली. मग क्रिकेट खेळणारे तरुण सुद्धा खेळात सहभागी झाले. क्रिकेट खेळल्यानंतर आयुक्तांना तरुणांशी संवाद साधला. त्यांच्या अडचणी विचारताना शहरातील क्रीडाधोरणाबाबत सूचना करा असेही सांगितले.

शहरात सिझन क्रिकेट खेळण्यासाठी मैदान नाही, तशा प्रकारच्या सुविधा नाहीत, काही मैदाने विकसित करणे गरजेचे आहेत, असे मत तरुणांनी आयुक्त दिलीप ढोले यांच्यासमोर व्यक्त केले. या सर्व सूचनांची आयुक्तांनी दखल घेऊन या सर्व अडचणी लवकरात लवकर सोडवण्यात येतील, एवढेच नव्हे तर महापालिकेतर्फे टर्फ क्लब तयार करून नाममात्र दरात ते खेळासाठी देण्याचा प्रस्ताव सुद्धा तयार करू, असा शब्द आयुक्तांनी दिला.

मीरा-भाईंदर शहरात अनेक नामवंत खेळाडू आहेतच, पण आणखी चांगले खेळाडू निर्माण व्हावेत याकरिता आवश्यक असणाऱ्या सर्व उपाययोजनांची कार्यवाही येणाऱ्या काळात करताना खेळाडूंना एक चांगला प्लॅटफॉर्म उपलब्ध करून देण्यात येईल, असे प्रतिपादन आयुक्त दिलीप ढोले यांनी केले.

# करिअर



**नियोजनकौशल्य काहीजणांमध्ये उपजतच असते. बरेचदा या कौशल्याचा वापर करून घेता येत नाही. अशा तरुणांसाठी व्यवस्थापनातील संधी तर आहेतच; पण तिकडेही आर्थिक अडचणींमुळे जाता येत नाही. अशा वेळी पर्यटनाच्या क्षेत्रातील टूर प्लॅनर बनण्याची वाट निश्चितच उपयोगी ठरते. अलीकडे, पर्यटनव्यवसायाला आलेले सुगीचे दिवस पाहता यामध्ये स्वतःचा व्यवसायही सुरू करता येईल. एखादी सहल प्लॅन करायची म्हणजे प्रवास कसा करायचा हे ठरवा, कुठे कधी जायचं ते ठरवा, हॉटेलचं बुकिंग, खाण्यापिण्याची सोय करा अशा अनेक भानगडी असतात. त्यातून सहलीचा आनंद घेणार तरी कसा? म्हणूनच मग  टूर ऑपरेटरवर ही सगळी जबाबदारी सोपवून सहलीचा आनंद घेण्याकडे पर्यटकांचा कल वाढत आहे.  नवनवीन जागा शोधण्याची आवड असेल, तर नक्कीच टूर ऑपरेटरचा विचार करा.**

## नियोजनबद्ध करिअरवाट



प्रवास आणि पर्यटन या दोन गोष्टींची अजिबात आवड नसणारे लोक एकदम विरळच असतात. कधी ना कधी प्रवास करावाच लागतो आणि रोजच्या कामाच्या दबावामधून जरा फ्री होऊन फिरून यावं, असा विचार करणारेही बरेच जण आपल्या आजूबाजूला दिसू शकतील. अलीकडच्या काळामध्ये लोकांची एकूणच आर्थिक परिस्थिती सुधारल्यामुळे आणि रोजचं जीवन तणावाखाली आल्यामुळे पर्यटनाला वाढती मागणी आहे. पूर्वी काही ठराविक सीझनमध्येच पर्यटन करण्याची पद्धत होती. उन्हाळ्याची सुट्टी आणि दिवाळीची सुट्टी हे दोन कालावधी पर्यटनासाठीच प्रसिह होते. अर्थात, अजूनही हे दोन सीझन म्हणजे पर्यटनाचा सुगीचाच काळ मानला जातो, पण जीवनशैलीतील बदलांनुसार, पर्यटनाचा खास असा कुठलाही काळ राहिलेला नाही.

कुठलीही सहल प्लॅन करताना आपल्याला लागतात ते माहितगार माणसं. आपल्याच कुटुंबातली किंवा आजूबाजूची पर्यटनाचा अनुभव असणाऱ्यांच्या अनुभवावरून आपण आपली सहल प्लॅन करत असतो. पण एखादी सहल प्लॅन करायची म्हणजे प्रवास कसा करायचा हे ठरवा, कुठे कधी जायचं ते ठरवा, हॉटेलचं बुकिंग, खाण्यापिण्याची सोय करा अशा अनेक भानगडी असतात. त्याच करत बसलं, तर सहलीचा आनंद घेणार तरी कसा, असा विचार आपल्यातले अनेक जण करतात. याच साठी 'ट्रॅव्हल ऑपरेटर' किंवा 'टूर ऑपरेटर' हा व्यवसाय सध्या जोरात आहे. आपली सुट्टी चांगली आणि आनंदामध्ये घालवायची असेल, तर आपल्याला चांगल्या टूर ऑपरेटरची गरज असतेच. 'टूर ऑपरेटर' म्हणून काम करणं सोपं अजिबात नसतं. त्यासाठी आपल्याकडे धडाडी, नवीन जागा स्वत: फिरण्याची तयारी, सगळीकडे कॉन्टॅक्ट्स वाढवण्याची हातोटी, वेळेचं भान राखून काम करण्याची सवय या आणि अशा अनेक गोष्टींची गरज असते.

एखादा टूर ऑपरेटर ग्राहकांच्या मागणीनुसार आणि गरजेनुसार सहली आखून आणि आयोजित करून देतो. तसंच, जर एखाद्या पर्यटन कंपनीमध्ये काम करत असेल, तर एखाद्या पर्यटन स्थळी सहल आयोजित करणं, प्रवासाची आणि राहण्याची व्यवस्था करणं आणि इतर व्यवस्था बघतात. तसंच, खाण्यापिण्याच्या व्यवस्थेपासून त्या स्थळावर बघण्यासाठी काय आणि कुठे जावं, याची संपूर्ण माहिती टूर ऑपरेटर ग्राहकांना देत असतो. टूर ऑपरेटरचं काम एकाच वेळी भरपूर उत्पन्न देणारं आणि आवडीचं  असू शकतं. एखाद्या निसर्गरम्य जागी पर्यटक एकदा किंवा दोनदा जातात. पण टूर ऑपरेटर म्हणून काम करताना आपलं ते नेहमीचं जाण्याचं ठिकाण होतं. पण या गोष्टीमुळे आपल्या उत्साहामध्ये कुठेही कमतरता येणं अपेक्षित नाही. आपल्या कंपनीला आणि ग्राहकांना एकाच वेळी समाधानकारक सेवा देणं, ही बाब तशी अवघड असते. आपले अनेक पर्यटक एखाद्या जागी पहिल्यांदाच येत असतात. त्यामुळे आपण त्याच जागी कितीही टूर्स केल्या असल्या, तरीही प्रत्येक टूरमध्ये तोच उत्साह कायम राखणं हे एक आव्हान असते. हे आव्हान आपण जितक्या सहजतेनं पेलू शकू, तितकी आपली प्रगती होत जाणार, हे निश्चित.

टूर ऑपरेटर म्हणून काम करताना आपल्याकडे काही गुण असणं आवश्यक आहे. पर्यटकांचा मोठा चमू सांभाळण्याची वेळही येत असल्यामुळे आपल्याकडे नेतृत्वगुण असणं महत्त्वाचं आहे. प्रत्येक ग्रुपमध्ये वेगवेगळ्या विचारांची आणि सवयींची माणसं असतात. त्यांना सांभाळणं आणि पर्यटनाचा आनंद घेणं, यासाठी नेतृत्व गुण असणं आवश्यक आहे. तसंच, प्रसंगावधान राखणंही आवश्यक असतं. पर्यटकांच्या ग्रुपमध्ये फिरण्याच्या, खाण्याच्या आणि इतर कुठल्याही समस्येला सामोरं जाण्याची जबाबदारी टूर ऑपरेटरवरच असते. त्यामुळे अचानक उद्भवलेल्या संकटांना हॅन्डल करण्याचं कसब टूर ऑपरेटरमध्ये असलं पाहिजे. तसंच, मृदुभाषी आणि सगळ्यांशी संवाद साधण्याची कला अंगात असणं अत्यावश्यकच आहे. संवादांशिवाय कुठलीही सहल पूर्णत्वाला जाऊ शकत नाही.

टूर ऑपरेटर म्हणून काम करण्यासाठी कुठल्याही शिक्षणाची अट अशी नसतेच. प्रत्यक्ष कामाच्या अनुभवाशिवाय इतर काहीही महत्त्वाचं नसतं. पण तरीही जर टूर ऑपरेटर म्हणून काम करण्याची इच्छा असेल, तर ट्रॅव्हल अँड टुरिझमचा एखादा डिप्लोमा किंवा सर्टिफिकेट कोर्स पूर्ण केला, तर त्याचा फायदा मिळू शकेल. या कोर्ससाठी अनेक ठिकाणी १० + २ ची पात्रता आवश्यक असते, तर काही ठिकाणी पदवी असणं आवश्यक मानलं जातं. याशिवाय, हल्ली 'टुरिझम अँड ट्रॅव्हल मॅनेजमेंट' असा अभ्यासक्रमही काही ठिकाणी सुरू झालेला आहे. टूर ऑपरेटर म्हणून काम करण्यासाठी हा अभ्यासक्रम उपयोगी पडू शकतो. एकदा या फिल्डमध्ये उतरण्याचं ठरवलं,की सगळ्यात चांगला मार्ग म्हणजे, आपली स्वत:ची टूरिस्ट कंपनी सुरू करणं. पण यासाठी आधी आपल्याकडे चांगला अनुभव असणं आवश्यक आहे. शिवाय, जर आपल्याला लगेच कंपनी सुरू करता येणार नसेल, तर दुसऱ्या कंपनीमध्ये टूर ऑपरेटर म्हणून काम करून अनुभवही मिळवू शकतो. राज्य शासनाच्या किंवा केंद्र शासनाच्या पर्यटन विभागामध्येही आपल्याला काम मिळू शकतं.

तसंच, सुरूवातीला ट्रेनी टूर ऑपरेटर म्हणून काम करतानाही साधारण १० ते १५ हजारांच्या घरात पगार मिळू शकतो. अनुभव घेऊन नंतर आपला पगारही वाढू शकतो आणि कालांतरानं आपली कंपनी उघडण्याचं स्वप्नही पूर्ण करू शकता. आपल्या आवडत्या जागी पुन्हा पुन्हा जाण्याची,  लोकांना मार्गदर्शन करण्याची आणि नवनवीन जागा शोधण्याची आवड असेल,म तर नक्कीच टूर ऑपरेटरचा विचार करा.

---

*सध्या करिअरच्या अनेक संधी उपलब्ध असताना नेहमीच करिअर सोडून बरेच जण वेगळ्या वाटांचा विचार करतात. पण त्यात सध्या पारंपरिक शेती व्यवसायाचा विचार करणारे फारच थोडे लोक असतील. मध्यंतरीच्या काळात मागे पडलेल्या या क्षेत्रात आता मात्र अनेक संधी उपलब्ध आहेत. शेती म्हटलं की आपल्या डोळ्यासमोर फक्त अन्न-धान्य, फळं या गोष्टी डोळ्यासमोर येतात. पण यात सध्या नवीन शाखा उदयाला आली आहे. ती म्हणजे फ्लोरिकल्चर. ज्यात करिअरच्या अनेक संधी आहेत.*

## फ्लोरीकल्चरची वेगळी वाट





**फ्लोरीकल्चर म्हणजे काय ? :** फुलांशी निगडीत असं हे क्षेत्र आहे. ज्यात फुलांची निर्यात, त्यांच्यावरच प्रोसेसिंग, त्याच्यापासून तेल, अर्क, परफ्युमची निर्मिती, सौंदर्य प्रसाधनांसाठी फुलांचा वापर करणे त्यासाठी त्यावर रिसर्च करणे, फुलांची रोपवाटिका तयार करणे, त्या रोपांची निर्यात करणे, असा या क्षेत्राचा बराच मोठा आवाका आहे.

फ्लोरिकल्चरची सुरुवात साधारणत: १८०० सालात इंग्लंडमधून झाली. तोपर्यंत फुलांची शेती असा प्रकार अस्तित्वात नव्हता. आता मात्र या क्षेत्राला जगभर मान्यता मिळाली आहे व अशा प्रकारचे काम करणाऱ्यांना जगभर मागणी आहे. सध्या नेदरलँड, जर्मनी, फ्रान्स, इटली, जपान, कोलंबिया, स्पेन, केनिया हे या क्षेत्रातले अग्रेसर देश असले तरी भारतातही फ्लोरीकल्चर या क्षेत्राबद्दल जागरूकता वाढत आहे व आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत भारतीय फुलांना चांगली मागणी आहे. भारतात फ्लोरीकल्चर या क्षेत्रात कर्नाटक हे अग्रेसर राज्य आहे. भारतात होणाऱ्या फुलांच्या एकूण होणाऱ्या निर्मिती पैकी ७५ टक्के निर्मिती कर्नाटक राज्यात होते. परंतु देशभर आता या क्षेत्राचा विचार केला जात आहे. त्यामुळे येणाऱ्या काळात या क्षेत्रात राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीला चांगले दिवस येणार आहेत. मुळातच निसर्गात रमण्याची आणि फुलांची आवड असणाऱ्यांनी तर या क्षेत्रात करिअर म्हणून नक्कीच विचार करावा.

फ्लोरिकल्चर या क्षेत्रात येण्यासाठी १२वी सायन्स असणे आवश्यक आहे. त्यात पीसीबी म्हणजे फिजिक्स, केमिस्ट्री आणि बायोलॉजी असे विषय निवडावे लागतात. फ्लोरीकल्चरमध्ये जाण्यासाठी विशेष कोर्स किंवा डिग्री उपलब्ध नाही. त्यामुळे बारावी सायन्सनंतर हॉर्टीकल्चर किंवा ॲग्रिकल्चर असा विषय घेऊन बी.एससी आणि मग एम.एससी. करता येते व एम.एससी करताना फ्लोरिकल्चर हा स्पेशल विषय म्हणून निवडता येतो. या क्षेत्रात पीएचडी ही करता येते. रिसर्च आणि डेव्हलपमेंटची आवड असेल, तर एम.एमसी नंतर फ्लोरिकल्चर हा विषय पीएचडीसाठी घेता येतो. पण त्यासाठी मास्टर्स डीग्री ही हॉर्टीकल्चर किंवा ॲग्रिकल्चरमध्येच असावी लागते.
याव्यतिरिक्त जर फ्लोरिकल्चरबरोबर मॅनेजमेंटचं शिक्षण घेतलंत तर फुलांच किंवा फुलझाडांच मार्केटींग करणे त्यावर प्रोससिंग करणे याचाही विचार करता येतो. काही विद्यापीठांमध्ये बी.एससी नंतर म्हणजेच आफ्टर ग्रॅज्युएशन फ्लोरिकल्चर डिप्लोमा किंवा कोर्स उपलब्ध आहे.
उदा. अन्नमली विद्यापीठ (उ्ळीींरपललश शर्वीलरींळेप) तमिळनाडू किंवा अलाहाबाद स्कूल, ऑफ ॲग्रिकल्चर उत्तर प्रदेश, पंजाब ॲग्रिकल्चर विद्यापीठ लुधियाना (पंजाब) इ. किंवा बी.एससी आणि एम.एससी ॲग्रिकल्चर मुंबई विद्यापीठ, पुणे विद्यापीठ, डॉ. बाबासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठ रत्नागिरी, भारती विद्यापीठ, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद येथे करता येते.

या क्षेत्रात शिक्षण घेतल्यानंतर सरकारी खात्यात नोकरीच्या अनेक संधी आहेत. शिवाय इस्टेट मॅनेजर, प्लांटेशन एक्सपर्ट, सुपरवायझर, प्रोजेक्ट कॉर्डिनेटर, कन्सलटंट अशा अनेक पदांवर मोठमोठ्या कंपनीत काम करता येते. तसंच पीएचडी केलं असेल, तर किंवा रिसर्च करत असाल तर फार्मिंग डेव्हलपमेंट करता येते. त्याचप्रमाणे फ्लोरल डिझायनर, ग्राऊंडस्किपर, लँडस्केप डिझायनर, लँडस्केप आर्किटेक्ट किंवा हॉर्टिकल्चरल थेरपिस्ट म्हणूनही काम बघता येतं. परीक्षक, निरीक्षक म्हणूनही काम करता येतं. शिकवण्याची आवड असेल, तर टिचिंगकडेही वळता येते. तसंच आपण स्वत:चा व्यवसायही सुरू करू शकता. ज्यात नर्सरी सुरू करून फुलांचा व्यवसाय, रोपवाटिका तयार करणे, यात उत्तम दर्जाची रोपं व फुलं असतील तर आंतरराष्ट्रीय पातळीवरही व्यवसाय करता येतो. तसंच वेगवेगळ्या कार्यक्रमात सजावटीसाठी फुलांची मोठी मागणी असते. अशा ठिकाणी नर्सरीतली उत्तम दर्जाची फुलं पाठवणं त्यांच डिझायनिंग करता येते.

या सगळ्यामुळे या क्षेत्रातला कामाचा आवाकाही मोठा आहे. आपण कोणत्या प्रकारचं काम करतोय याप्रमाणे या क्षेति उत्पन्न मिळते व कंपनीतही कामाच्या स्वरूपानुसार पगाराचे स्वरूप असते. परंतु यासाठी पुढील गुण असणेही तितकेच महत्त्वाचे आहे.

सगळ्यात आधी निसर्गाप्रती प्रेम आणि आपुलकी असली पाहिजे. संयमाने काम करण्याची तयारी हवी. निरीक्षणशक्ती चांगली हवी. क्रिएटिव्हिटी आणि कलात्मक दृष्टिकोन असायला पाहिजे. तुमचा फिजिकल स्टॅमिनाही उत्तम हवा. म्हणजेच तुम्ही काटक असणे गरजेचे आहे. कॉम्प्युटर क्षेत्रातले जर थोडेफार ज्ञान असेल, तर तुमच्यासाठीच्या संधी वाढू शकतात.

ज्यांच्याजवळ स्वत:ची शेती आहे अथवा शेती-विषयक शिक्षण आत्ता चालू असेल, तर स्पेशल विषय म्हणून फ्लोरिकल्चरचा विचार करायला काहीच हरकत नाही. या व्यतिरिक्त बारावी नंतर ज्यांना अग्रिकल्चर करण्याची इच्छा आहे त्यांच्यासाठीही फ्लोरिकल्चर हे बुमिंग करिअर ठरू शकते.

---

**मेट्रो शहरांपासून खेडेगावातील गल्लीबोळांपर्यंत पुरुष आणि महिलांसाठीचे पार्लर सर्वत्र बघायला मिळत आहेत. वेगवेगळ्या प्रकारच्या शृंगाराबरोबरच केश-रचना अर्थात हेअर स्टाईलची भूमिका यामध्ये अधिक महत्त्वाची दिसून येते. कारण व्यक्तिमत्त्व आकर्षक बनवण्यामध्ये केसांची अतिशय महत्त्वाची भूमिका असते. केसांची स्टाईल बदलली तर व्यक्तीमत्त्वात आमूलाग्र बदल दिसून येतो. दुसऱ्या शब्दात सांगायच तर व्यक्तीची ओळखच बदलते. प्रत्येक व्यक्तीच्या अंगकाठीनुसार आणि चेहऱ्यांच्या आकारानुसार हेअर स्टाईल निश्चित केली जाते. यासाठी हेअरस्टाईलीस्ट अतिशय महत्त्वाचा असतो. अलिकडच्या काळात पारंपारिक पध्दतीने केस कापणारे जुने लोक या पंक्तीत येऊ शकत नाही. हेअरस्टाईलीस्टना या मंडळींपेक्षा काही मॉडर्न आणि आजच्या काळाची गरज ओळखून, बदलते ट्रेण्ड्स आत्मात करून त्याप्रमाण काम करावे लागते. हेअरस्टायलिस्ट होण्यासाठी विशिष्ट प्रकारचे प्रशिक्षण घेणेही अतिशय महत्त्वाचे बनले आहे.**

## 'स्टायलिश' कारकिर्द



**हेअर स्टाईलिंगसाठी कोर्सेस :** हेअर स्टाईलींगवर आधारीत भिन्न भिन्न ट्रेनिंग कोर्सेस आता जगभरात लहान-मोठ्या स्वरुपात आयोजित केले जातात. या कोर्सेसचा कार्यकाळ तसा निश्चित नसला तरी साधारणपणे  सात दिवसांपासून ते एक वर्षापर्यंत असतो. काही संस्था ब्युटीकल्चर कोर्स अंतर्गत अशा प्रकारचे ट्रेनिंग अनिवार्य देण्याची सोय करतात. या वेगवेगळ्या कोर्सेचा उद्देश म्हणजे केशरचनेतील विविध प्रकार आणि ट्रेण्ड जाणून घेणे हा असतो. यामध्ये न्यु लुक क्रिएट करणे, आकार, रंग बदलणे असे विविध प्रकार असतात. त्याचबरोबर केसांची रचना करताना डोक्याची त्वचा, त्या व्यक्तीची प्रकृती, व्यक्तिमत्त्व या बाबींचाही अभ्यास करणे आवश्यक असते. अलीकडे परदेशात आणि भारतातील काही शहरांमध्ये देखील एखाद्या व्यक्तीचा लुक बदलण्यासाठी कॉम्प्युटर मॉडेलचा आधार घेतला जातो. हेअर स्टाईलींगच्या ट्रेनिंगमध्ये कोबिंग, पर्मिंग, स्पाइकिंग या व्यतिरिक्त हेअर कटींगची विविध प्रकारचे तंत्र या सर्वांसंबंधित व्यावहारिक आणि सैद्धांतिक ज्ञान दिले जाते.

**आवश्यक कौशल्ये :** यामध्ये केसांच्या गुण-दोषानुसार हेअर स्टाईल निश्चित कशी करावी, केसांचा रंग, केस कलर करणे याबाबत सखोल मार्गदर्शन केले जाते. निर्मितीक्षमता, नवे विचार आणि काही वेगळे करून दाखवण्याची इच्छा असेल तर या क्षेत्रात स्वत:चे स्थान निर्माण करणे फारसे अवघड नाही.

**ट्रेनिंग घेतल्यानंतर... :** ट्रेनिंग सोबतच प्रत्यक्ष कामाचा अनुभव या क्षेत्रात खूप महत्वाचा असतो. तसेच एकदा ट्रेनिंग घेतले म्हणजे झाले असेही नाही तर सतत नवीन ट्रेण्ड्सचे निरीक्षण करण गरजेचे असते. त्यासाठी इंटरनेट, ब्युटी मॅगझिन्स आणि या क्षेत्रातील दिग्गजांशी संपर्कात राहणे, त्यांच्या कामाचा अभ्यास करणे खूप आवश्यक असते. याबरोबरच नवे प्रयोग करून स्वत:चे वेगळेपण सिद्ध करणेही महत्त्वाचे असते.

**शैक्षणिक पात्रता :** या कोर्सेससाठी साधारण बारावी नंतर प्रवेश दिला जातो. अनेक खासगी संस्थांमध्ये दहावीनंतरही प्रवेश दिला जातो. अशा प्रकारचे ट्रेनिंग घेतलेल्या तसेच कुशल, सर्जनशील हेअरस्टायलिस्टना चित्रपटसृष्टी, इलेक्ट्रॉनिक मिडिया, फॅशन शो, ब्युटी पार्लर, वेगवेगळे इव्हेण्ट्स, लग्नसमारंभ, उच्चभ्रू वर्गातील पार्ट्यांमध्ये मोठ्या प्रमाण असते. इतकेच नाही तर मिडिया प्रॉडक्शन हाऊसेस, फाइव्ह स्टार हॉटेल्स, क्लब, नाईट पार्ट्या या ठिकाणीही यांच्याकडून सेवा घेतली जाते.



**वेतनमान आणि संधी :** कल्पकता, अनुभव, सफाईदारपणे हेअर स्टाईल करणे यांसारख्या बाबी विचारात घेऊन त्यानुसार वेतन, किंवा कॉन्ट्रॅक्टवर आधारित फी दिली जाते. विदेशात तर हेअर स्टाइलिंगचा प्रसार सामान्य लोकांमध्ये मोठ्या प्रमाणात झालेला आहे. त्यामुळे इटली फ्रान्स, अमेरिका, लंडन त्याचबरोबर इतर युरोपीय देशात नव्या दमाच्या, कुशल हेअर स्टाईलिस्टना नेहमीच मागणी असते.

अलीकडील काळात भारतातही मोठ्या शहरांमध्ये हेअर स्टाईलिस्टला खूप महत्त्व आले आहे. सुसज्ज पार्लरमध्ये साध्या साध्या हेअर कट्ससासठी दीड ते दोन हजार रुपये प्रत्येकी घेतले जातात. तुमचे कौशल्य जेवढे अधिक तेवढा अधिक मोबदला या क्षेत्रात तुम्हाला मिळवता येईल. काही मोठे हेअर स्टाईलिस्ट एका कट्चे पाच ते दहा हजार  रुपये देखील घेतात. मात्र यासाठी तेवढी मेहनत आणि कल्पकता असणे गरजेचे आहे. एक वेगळे करिअर म्हणून या क्षेत्राकडे बघायला काहीच हरकत नाही.

---

## क्रोमोथेरपीमध्ये करिअर

***नैसर्गिक उपचार पद्धतीतील लोकांचा रस वाढत आहे. या नव्या क्षेत्रामध्येही करिअरच्या काही नव्या संधी आहेत. क्रोमोथेरपीकडे आज एक करिअर ऑप्शन म्हणून पाहिले जात आहे. रंगांच्या माध्यमातून उपचार कसे केले जातात आणि या क्षेत्रामध्ये करिअर कसे करता येते हे जाणून घेऊया...***



रंगांमुळे आपले शरीर निरोगी राहू शकते हे आपल्या जुन्या विद्याभ्यासामध्ये स्पष्ट करण्यात आले आहे. परंतु आपण याकडे बरेच दुर्लक्ष केले. परंतु सध्याच्या सरकारने आयुष विद्येला मेडकल क्षेत्रामध्ये सामाविष्ट करण्याचा निर्णय घेतयला आहे. त्यामुळे सरकारी आत्ता क्रोमोथेरपी सारख्या जुन्या ज्ञानालाही व्यावसायिक आधार मिळेल.

**क्रोमोथेरपी म्हणजे काय? :** नीळा, पिवळा, हिरवा, नारंगी, जांभळा, लाल आणि काळा या सात रंगांच्या माध्यमातून अंतर्गत तसेच वाह्य रोगांवर इलाज करणे म्हणजे क्रोमोथेरपी. पुराण काळापासून ही पद्धती आपल्याकडे वापरली जाते. आपले आरोग्य निरोगी ठेवण्यासाठी ही एक अत्यंत परिणाम कारक ठरलेलली पद्धती आहे.

**रंगांचे विज्ञान :** इतर पद्धतींपेक्षा या उपचार पद्धतीची कार्यप्रणाली अतिशय वेगळी आहे. यामध्ये खाणे-पिणे, योगासन, विश्रांती आणि ध्यान यावरही विशेष भर दिला जातो. औषधांवर अवलंबून राहण्याऐवजी याद्वारेच इलाज करण्यावर भर दिला जातो. ही पद्धती अनेक वैज्ञानिक तथ्यांवर आधारलेली आहे. या पद्धतीनुसार असे मानले जाते की, प्रत्येक माणसाला एका निश्चित रंग आणि प्रकाशाचा आवश्यकता असते. ज्यामुळे माणसातील शारिरीक घड्याळ व्यवस्थित काम करते. ठराविक कंपनामुळे प्रत्येक रंग आपल्या शरीरातील कामकाज सुरळित चालण्यास सहाय्यभूत ठरतो.

**कामाचे स्वरूप :** यामध्ये कोणत्याही शरीरिक व्याधीसाठी शरीरातील रंगांचेप्रमाण कमी किंवा जास्त करुन उपचार केले जातात. उपचारतज्ज्ञ रंगमापन यंत्राच्या साहाय्याने शरीरातील रंगांचा अभाव किंवा त्यांचे जादा प्रमाण याची माहिती घेतात आणि या रंगांना एका ठराविक पातळीपर्यंत वाढवतात किंवा कमी करतात. निरनिराळे रंग आणि शारीरिक लक्षणांचा नेमका कसा संबंध असतो हे पाहुया.

निळा रंग : ब्लड प्रेशर कमी करते. हृदयाची गती आणि श्वासच्छोवासावर नियंत्रण ठेवते.

हिरवा रंग : शरीर आणि मेंदुलाही शांत आणि स्थिर ठेवते.

लाल रंग : या रंगामुळे ब्लड प्रेशर, हृदयाची गती आणि श्वासोच्छवास वाढवते.

नारंगी रंग : निराशा दूर करते.

पिवळा रंग : शरीरातील उर्जा वाढवते.

काळा रंग : निराशा दूर करुन आत्मविश्वास वाढवतो.

गुलाबी रंग : शरीरातील स्नायूंना आराम देतो.

**कोर्सेस :** या क्षेत्रामध्ये करिअर करण्यासाठी जॅम-टॅली-क्रोमोथेरपी हा सहा महिन्याचा डिप्लोमा किंवा दोन वर्षासाठी पदवी अभ्याक्रमही करता येतो. या अभ्यासक्रमाला प्रवेश मिळवण्यासाठी दहावी आणि बारावी पास असण गरजेच आहे.

**करअरच्या संधी :** या क्षेत्रामध्ये भरपूर संधी आहेत. क्रोमोथेरपीस्ट पदवी घेतल्यानंतर स्वतःचा दवाखाना सुरू करता येतो.` नॅचरोपॅथी क्लीनिक, निसर्गोपचार केंद्र, हेल्थ केअर सेंटरमधूनही प्रॅक्टीस करू शकता.

**प्रमुख संस्था**

इन्स्टिट्यूट ऑफ हेल्थ केअर ॲण्ड रिसर्च, कलकत्ता वेबसाइट : www.altmedinshtule.com

इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ अल्टरनेटिव्ह मेडिसिन, कलकत्ता वेबसाइट : www.altmed-university.com

इन्स्टिट्यूट ऑफ नॅचरोपॅथी ॲण्ड योग सायन्स, बेंगलुरू वेबसाइट : www.inysoline.org

### गृहनिर्माण मंत्र्यांची म्हाडाच्या अधिकाऱ्यांशी बैठक

# वर्तकनगरात समाज मंदिर संघर्ष समितीला 'बाप्पा' पावला

**ठाणे : वर्तकनगरवासीयांच्या सामाजिक आणि सांस्कृतिक जडणघडणीचा अविभाज्य भाग असलेल्या 'वर्तकनगर समाजमंदिर सभागृहाच्या' भूखंडाचे श्रीखंड लाटण्याच्या कुटिल डाव खाजगी संस्थेने आखला आहे. याविरोधात एकवटलेल्या वर्तकनगरवासियांना याप्रश्री आता बाप्पा पावला आहे.**

गेल्या अनेक महिन्यांपासून भिजत घोंगडे पडलेल्या समाज मंदिराच्या याप्रश्री राज्याचे गृहनिर्माण मंत्री डॉ. जितेंद्र आव्हाड यांनी म्हाडाच्या अधिकाऱ्यांची व समाज मंदीर संघर्ष समिती चे सदस्य यांची एकत्रित बैठक बोलवली होती. याबाबत सकारात्मक तोडगा गृहनिर्माण मंत्र्यांच्या दरबारात निघेल, अशी सर्वपक्षीय समिती सदस्यांसह स्थानिकांनाही आशा आहे. यासोबतच ठाणे जिल्ह्याचे पालकमंत्री तथा राज्याचे नगरविकासमंत्री एकनाथ शिंदे याबाबत काय भूमिका घेतात, याकडे वर्तकनगरवासियांचे लक्ष लागून राहिले आहे.

कामगार व कष्टकऱ्यांची वसाहत अशी ओळख असलेल्या वर्तकनगरात 1965 पासून मध्यवर्ती भागात समाजमंदिर सभागृह अस्तित्वात आहे. आण्णासाहेब वर्तक नगर गणेशोत्सव, लग्नसमारंभ, कबड्डी सामने, व्यायामशाळा आदी कार्यक्रमांसाठी या सभागृहाचा उपयोग होत असे. मात्र काही वर्षांपुर्वी समाजमंदिर सभागृह धोकादायक झाल्याचे कारण देत ही वास्तू जमीनदोस्त करण्यात आली. त्यानंतर म्हाडाने 'विहंग महिला औद्योगिक उत्पादक सहकारी संस्थे'ला संबंधित भूखंडाच्या पुनर्विकासाची परवानगी दिली. आश्चर्याची बाब म्हणजे, या संस्थेचा व समाजमंदिरांचा काडीमात्र संबंध नसून संस्थेच्या माध्यमातून वर्तकनगरात कोणतेही सामाजिक कार्य केलेले नाही. फक्त आर्थिक फायदा लाटण्यासाठी आणि समाजमंदिराचा



मोक्याचा भूखंड गिळंकृत करण्यासाठी या संस्थेने पुर्नविकासाच्या माध्यमातून 'भूखंडाचे श्रीखंड' लाटण्याचा डाव आखल्याचा आरोप वर्तकनगर समाजमंदिर संघर्ष समिती"च्या शिवसेना, मनसे, भाजप ,राष्ट्रवादी ,काँग्रेस च्या सर्वपक्षीय सदस्य व स्थानिकांनी केला आहे. विशेष म्हणजे, या समाजमंदिरातील सभागृहात होणारा आण्णासाहेब वर्तकनगर गणेशोत्सव संपूर्ण ठाणे शहरात प्रसिद्ध होता. समाजमंदीर सभागृहाची जागा पत्रे लावून बंदिस्त असल्यामुळे गणपती रस्त्यावर बसवावा लागत आहे. त्याच गणेशोत्सवाच्या पूर्वसंध्येला म्हाडाच्या अधिकाऱ्यांसोबत गृहनिर्माण मंत्री डॉ. जितेंद्र आव्हाड यांनी बैठकीत चर्चा केली.

या बैठकीत म्हाडाच्या अधिकाऱ्यांनी समाजमंदीरप्रश्री विविध कागदपत्रे सादर केली असून आव्हाड याप्रश्री काय तोडगा काढतात. त्यावर संघर्ष समितीच्या आंदोलनाची दिशा ठरणार असल्याची माहिती समितीच्या सदस्यांनी दिली. दरम्यान, गेल्याच महिन्यात याप्रश्री संघर्ष समितीच्या पदाधिकाऱ्यांनी आव्हाड यांच्यासह पालकमंत्री एकनाथ शिंदे यांचीही भेट घेतली होती. त्यावेळी दोघांनीही याप्रश्री सकारात्मक तोडगा काढण्याचे आश्वासन समितीच्या सदस्यांना दिले. त्यामुळे आता पालकमंत्र्यांच्या भूमिकेनुसार समिती सदस्य निर्णय घेणार आहेत.

## येऊरमध्ये सर्रास वृक्षतोड; चोरट्या लाकडांसह टेम्पो जप्त

**ठाणे : येऊरमध्ये बेकायदेशीरपणे बांधकामे होत असतानाच वनविभागाच्या दुर्लक्षामुळे सर्रास वृक्षतोड होत आहे. मंगळवारी येथील तरुणांनी लाकडांची चोरटी वाहतूक उघडकीस आणली. झाडांच्या ओंडक्यांसह टेम्पो जप्त करण्यात आला आहे.**

सोमवारी मध्यरात्री येऊर जंगलात अनेक बेकायदेशीर झाडं तोडण्यात आली. झाडांचे ओंडके एका टेम्पोमध्ये (एमएच 04 केएफ 7899) भरुन गावातून जात असल्याचे गावातील तरुणांच्या लक्षात आले. त्यांनी टेम्पोला ओव्हर टेक करत वनविभागाची चौकी गाठली. वनविभागातील सुरक्षा रक्षक गाढ झोपेत असताना या तरुणांनी चौकीवरील गेट बंद करून वन विभागाच्या सुरक्षा रक्षकांना कळविले तसेच वर्तकनगर पोलिसांना फोन करून माहिती दिली.

टेम्पोतील चालक आणि अन्य पळून जाण्यात यशस्वी ठरले.



वनविभागाने टेम्पो ताब्यात घेतला आहे. वास्तविक स्थानिक पोलीस व वनाधिकाऱ्यांनी या घटनेची तत्काळ नोंद घेऊन टेम्पोतील व्यक्तींना ताब्यात घेऊन पंचनामा करणे आवश्यक होते. मात्र दुपारी दोन वाजेपर्यंत तब्बल बारा तास उलटूनही कोणत्याही प्रकारची कायदेशीर कारवाई या ठिकाणी झाली नसल्याचे कळते.

या संदर्भात ठाण्याचे जिल्हाधिकारी राजेश नार्वेकर यांच्याकडे तक्रारींचे निवेदन देण्यात आले. उपविभागप्रमुख अशोक कुलकर्णी, युवासेना विभाग समन्वयक किशोर म्हात्रे, शाखाप्रमुख रमेश वळवी, विकास बरफ, रवि निमले, नरेश ठाकरे आदींनी या प्रकरणी दोषी व्यक्तीवर कायदेशीर कारवाई व्हावी अशी मागणी निवेदनात केली आहे.

## उल्हासनगरात बाळासाहेब ठाकरे मिनी स्टेडियमचे भूमिपूजन

उल्हासनगर: क्रीडाप्रेमींच्या स्वप्नांची स्वप्नपूर्ती करताना बाळासाहेब ठाकरे मिनी स्टेडियम उल्हासनगरात उभारण्यात येणार असून नगरविकास तथा ठाणे जिल्हा पालकमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते या स्टेडियमचे भूमिपूजन करण्यात आले.

यासोबतच मलशुद्धीकरण केंद्र, ड्रेनेज स्वच्छ करणारा रोबोट, विद्यार्थ्यांना सायन्स शैक्षणिक किट, अत्याधुनिक बोटींचा लोकार्पण सोहळा देखील एकनाथ शिंदे यांच्या हस्ते पार पडला. यावेळी राष्ट्रपती पदक विजेच्या अग्निशमन दलाच्या चार जवानांचा सत्कार देखील करण्यात आला.

13 हजार स्केअर मीटरच्या भव्य जागेत हे स्टेडियम येत्या दोन वर्षात उभारण्यात येणार आहे. त्यात फुटबॉल, लॉन टेनिस, व्हॉलीबॉल, बास्केटबॉल, कॅरम, बॅडमिंटन, बिलिअर्ड, स्नुकर, जिम्नॅशियम, स्विमिंगपुल असणार असून बाळासाहेब ठाकरे यांच्या दुर्मिळ छायाचित्रांचे म्युझियम असेल. स्टेडियममध्ये ऑलांपिक दर्जाचे खेळ होणार आहेत.

उल्हासनगरातील अनधिकृत बांधकाम नियमित करण्यासाठी दंड कमी करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. त्यामुळे शहरवासीयांना लवकरच अधिकृत घर मिळणार, असे आश्वासन एकनाथ शिंदे यांनी दिले.

पालिकेला रोबोट देणारे टाटा ग्रुपचे सागरिका, राशीद, रिजन्सी ग्रुपचे महेश अग्रवाल, उद्धव रुपचंदानी, अनिल भटीजा यांचा सत्कार एकनाथ शिंदे यांनी केला.

पालकमंत्री एकनाथ शिंदे, खासदार डॉ.श्रीकांत शिंदे यांच्यामुळे फक्त एका वर्षात तब्बल सव्वादोनशे कोटी रुपयांचा निधी मिळाला आहे. बाळासाहेब ठाकरे मिनी स्टेडियमबाबत 10 वर्षांपासूनचा पाठपुरावा एकनाथ शिंदे, श्रीकांत शिंदे यांनी प्रत्यक्षात उतरवला आहे. उल्हासनगर विकासाची कात टाकत असल्याचे प्रास्ताविक शिवसेना नगरसेवक धनंजय बोडारे यांनी केले.

यावेळी खासदार श्रीकांत शिंदे, महापौर लिलाबाई आशान, आयुक्त डॉ.राजा दयानिधी, जिल्हाप्रमुख गोपाळ लांडगे, उपजिल्हाप्रमुख चंद्रकांत बोडारे, आमदार रविंद्र फाटक, डॉ.बालाजी किणीकर, शिवसेना शहरप्रमुख राजेंद्र चौधरी, सभागृहनेते भारत गंगोत्री,विरोधी पक्षनेता किशोर वनवारी, माजी महापौर पंचम कालानी, साई पक्षाचे जीवन ईदनानी, काँग्रेसचे रोहित साळवे,नगरसेवक धनंजय बोडारे, अरुण आशान, राजेंद्रसिंग भुल्लर, कलवंतसिंग सोहता, महेश नगरसेविका शीतल बोडारे, वसुधा बोडारे, संगीता सपकाळे आदी उपस्थित होते.



हनुमाननगर वागळे इस्टेट, ठाणे येथे नागरिकांचे लसीकरण करण्यात आले. या प्रसंगी उपस्थित असलेले नव निर्वाचित स्थायी समिती सदस्य, शिवसेना उपविभाग प्रमुख एकनाथ भोईर, परिवहन समितीचे माजी सभापती दशरथ यादव, माजी नगरसेविका राधा फतेबहादूर सिंह व इतर (छाया: रामसिंह)






## स्मित वृद्धाश्रमात थरथरत्या हातांनी साकारली गणेशमूर्ती

ठाणे: बेघर, गरीब, अपंग आणि मानसिकदृष्ट्या आजारी वृद्धांना संभाळणाऱ्या स्मित वृद्धाश्रमात पर्यावरण संवर्धनाची संकल्पना घेऊन स्मित फाऊंडेशन व कला क्षेत्रातील प्रसिद्ध स्केचो ॲक्टीवीटी सेंटर यांच्या संयुक्त विद्यमाने पर्यावरणपूरक शाडू मातीपासून इकोफ्रेंडली गणपती मूर्ती मेकिंग कार्यशाळेचे आयोजन 8 सप्टेंबर 2021 रोजी संजीवनी कॉम्प्लेक्स रेतीबंदर रोड, काल्हेर भिवंडी येथे करण्यात आले.

प्रदूषण विरहित व नैसर्गिक विसर्जनाची सुरवात व्हावी यासाठी मूर्तिकार चित्रकार आरती शर्मा यांच्या मार्गदर्शनाखाली वय वर्षे 70 पासून ते 96 वर्षांच्या वृद्धांनी गणेशमूर्ती साकारली. 89 वृद्धांनी स्वतःच्या हातांनी बाप्पाची इकोफ्रेंडली मूर्ती साकारण्याचे शास्त्रशुद्ध तंत्र या कार्यशाळेत घेतले. अधिक माहितीसाठी 9372223611 या क्रमांकांवर संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.



### गणेशोत्सवातील प्रतिबंधामुळे उमेदवारांचा उत्साह मावळला

भिवंडी: भिवंडी महानगरपालिकेची निवडणूक जाहीर झाल्यानंतर राजकीय पक्षाने मोर्चेबांधणी सुरु केली आहे, मात्र सार्वजनिक गणेशोत्सवावर आपली छाप पडावी या उद्देशाने पुढे आलेल्या उमेदवारांचे मनसुबे शासनाच्या विविध प्रतिबंधनामुळे पार धुळीस मिळाले आहेत.

शहरात काही सार्वजनिक उत्सवाचे पदाधिकारी मनपाचे नगरसेवक असून काही नगरसेवक सार्वजनिक गणेशोत्सव त्यांच्या निवडणुकीच्या प्रचारासाठी देखील करीत असतात. या माध्यमातून जाहिराती फलक लावून ते आपल्या ब्रॉण्डचा प्रचार करीत असतात. मात्र शासनाने मंडपात भाविकांना प्रत्यक्ष गणेश दर्शन देण्याची मनाई करून ऑनलाईन अथवा इलेक्ट्रिक माध्यमातून भाविकांना गणेश दर्शन करून देण्याचे आवाहन केल्याने अशा पदाधिकाऱ्यांचा उत्साह मावळला आहे. त्याच बरोबर शहरातील सार्वजनिक मंडळाच्या कार्यकर्त्यांचा देखील उत्साह मावळला आहे.


अखिल सार्वजनिक गणेशोत्सव महासंघ

ठाणेवैभव KYT

**स्पर्धा नव्हे...! उत्सवी उपक्रम...!**

**सार्वजनिक गणेशमंडळांनी .....**

करोनानियम पालन करुन सर्वसामान्यांचे मनोबल वाढविण्यासाठी उत्सवकाळात विभागातील महिला व मुलांच्या सहभागातून सामुदायीक ऑनलाइन पध्दतीने अथर्वशीर्ष पठण (मराठीअर्थासहीत) आयोजन करावे.

गणेशमंडळांनी आपल्या विभागातील देशासाठी लढणाऱ्या भारतीय सैनिकांचे त्यांच्या कुटुंबियांचे तसेच राज्यस्तरीय / राष्ट्रस्तरीय खेळाडूंचे सन्मान सोहळ्याचे करोना नियमपालन करुन आयोजन करावे.

अशा लोकहितकारी उपक्रमांमधूनच गणेशमंडळांची महासंघाकडून दखल घेतली जाणार असून सदर यशस्वी मंडळांना महासंघाकडून गौरविण्यात येणार आहे याची सार्वजनिक गणेशमंडळांनी नोंद घ्यावी.

सदर उपक्रमाचे फोटो वेळोवेळी महासंघाच्या पेजवर अपलोड करावे
https://www.facebook.com/ganeshotsavmahasangha/

संपर्क : thanevaibhav1975@gmail.com
श्री राजेंद्र झेंडे : ९८२०२७०१५५



